# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शनिवार । दि. १ ऑगस्ट २०२६ । अंक ५६ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## शहीद निलेश तुणतुणेंचा आज स्मृतिदिन

**रायगड :** कारगिल युद्धात मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देणारे शहीद निलेश तुणतुणे यांचा २८वा स्मृतिदिन शनिवारी (दि. १) सहाणगोठी येथे श्रद्धापूर्वक साजरा करण्यात येणार आहे. शहीद निलेश तुणतुणे ट्रस्ट आणि पंचायत समिती अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेनऊच्या सुमारास शहीद निलेश तुणतुणे यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी पोलीस दलाकडून पान २ वर

## कृषीवल हेरगिरी

# महसूल अधिकाऱ्याचे 'लँड कनेक्शन' उघड?

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी लक्ष देण्याची गरज

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील वाढते पर्यटन, प्रस्तावित महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि गगनाला भिडलेल्या जमिनीच्या किमतींच्या पार्श्वभूमीवर महसूल व भूमीअभिलेख विभागातील काही अधिकाऱ्यांनी शासकीय नियमांना हरताळ फासत जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या व्यवहारांतील संबंधित जमिनींचे सातबारे आणि इतर कागदपत्रे 'कृषीवल'च्या हाती लागले आहेत. विशेष म्हणजे, हे व्यवहार थेट स्वतःच्या नावाने न करता नातेवाईकांच्या नावाने करण्यात आल्याचा आरोप असून, त्यामुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी याप्रकरणी गंभीर आरोप करत, राजकीय नेते, उच्चपदस्थ शासकीय अधिकारी आणि परराज्यातील काही व्यक्तींनी अलिबाग परिसरात मोठ्या प्रमाणात जमिनींची खरेदी केल्याचे म्हटले आहे. या आरोपांमुळे महसूल विभागातही चर्चांना उधाण आले आहे. अलिबाग तालुक्यातील निसर्गरम्य वातावरण, स्वच्छ समुद्रकिनारे आणि वेगाने वाढणारा पर्यटन व्यवसाय पान २ वर

### कार्ले गावात जमिनीचा व्यवहार

अलिबाग तालुक्यातील कार्ले गावात महसूल विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने आपल्या वडिलांच्या नावाने जमीन खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित जमिनीच्या सातबारा उताऱ्यानुसार पो.ख. क्षेत्र १२.१० गुंठे, लागवडीखालील क्षेत्र ३५ गुंठे असून, एकूण क्षेत्र ४७ गुंठे इतके आहे. या व्यवहाराबाबत संबंधित अधिकाऱ्याने शासकीय नियमांनुसार सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतली होती का, तसेच शासनाला आवश्यक माहिती कळविण्यात आली होती का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

## वेधक

### भिवंडीत इमारत कोसळली; ९ ठार



**मुंबई :** भिवंडीमध्ये गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास चार मजली इमारतीचा काही भाग अचानक कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली. भंडारी कंपाऊंडमधील गंगारामवाडी येथील कोहिनूर अपार्टमेंटच्या बी-विंगचा भाग कोसळून आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाला असून, तिघे गंभीर जखमी आहेत. ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकले असण्याची शक्यता असल्याने रात्रीपासून युद्धपातळीवर पान २ वर

### गांजा, हेरॉईनचा लाखोंचा साठा जप्त

**रायगड :** अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी वरसोली समुद्रकिनारी आलेल्या परराज्यातील इसमाला अलिबाग पोलिसांनी रंगेहाथ ताब्यात घेतले. त्याच्याकडून २ लाख ६८ हजार १०० रुपयांचे ७.६६ ग्रॅम हेरॉईन आणि ५० हजार रुपयांचा २.०६ किलो गांजा, असा एकूण ३ लाख १८ हजार १०० रुपयांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई गुरुवारी (दि. ३०) रात्री करण्यात आली. अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांना गांजा व हेरॉईनचा साठा घेऊन एक इसम वरसोली समुद्रकिनारी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पान २ वर

### क्षुल्लक कारणावरून एकास मारहाण

**रसायनी :** तुराडेवाडी येथील पाण्याच्या टाकीजवळ बसण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या घटनेत विनोद विजय वाघे (२८) जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोशन विलास वाघे, आर्यन बाळू वाघे आणि साहिल राजा वाघमारे यांच्यासोबत विनोद वाघे यांचा वाद झाला. यावेळी साहिल वाघमारे याने लोखंडी सळईने विनोद यांच्या गुडघ्यावर मारले, तर रोशन व आर्यन यांनी डोळा व डोक्याच्या मागील बाजूस मारहाण केली. भांडण सोडविण्यास आलेल्या विनोद यांच्या पत्नीलादेखील मारहाण करण्यात आली. याप्रकरणी तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ अधिक तपास करीत आहेत.

## अतिवृष्टीबाधित पेणच्या गणेशमूर्तीकारांना मदतीची प्रतीक्षा

# 437 मूर्तिकार उद्ध्वस्त

- ५० हजारांहून अधिक मूर्तींचे नुकसान, कोट्यवधींचा फटका
- हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर संकट

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**



पेणच्या गणेशमूर्ती उद्योगाला अतिवृष्टीचा जबर फटका बसला असून तब्बल ४३७ मूर्तिकारांचे कारखाने बाधित झाले आहेत. कारखान्यांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने ५० हजारांहून अधिक गणेशमूर्ती, रंगकामाचे साहित्य, साचे, शाडूची माती आणि कच्च्या मालाचे मोठे नुकसान झाले आहे. गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक असताना मूर्तिकारांसमोर आता ग्राहकांच्या ऑर्डर वेळेत कशा पूर्ण करायच्या, हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. दरम्यान, नुकसानीमुळे कोट्यवधी रुपयांचा फटका बसला असून, या पारंपरिक व्यवसायावर अवलंबून असलेल्या पाच हजारांहून अधिक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाकडून वेळेत भरपाई मिळाल्यास हा उद्योग पान २ वर

### मोठी आर्थिक हानी

रायगड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मोठ्या प्रमाणावर वित्त व जीवितहानी झाली आहे. ४,९१३ घरांमध्ये पाणी शिरले, २८४ दुकाने, ८६ गोठे, २० पोल्ट्री आणि ५ झोपड्यांचे नुकसान झाले. या आपत्तीत १२ जणांचा मृत्यू झाला असून ११ हजार ४३६ कोंबड्या आणि २१९ पशुधनाची हानी झाली आहे. अनेक कुटुंबे, शेतकरी, पशुपालक आणि पोल्ट्री व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असून, नुकसानग्रस्तांना शासनाच्या मदतीची प्रतीक्षा आहे.

## रोह्यात दमखाडी नाक्यावर स्लॅब कोसळला

**। चणेरा । प्रतिनिधी ।**



रोहा शहरातील वर्दळीच्या दमखाडी नाक्याजवळ गुरुवारी रात्री मुसळधार पावसात नाल्यावरील सुमारे २५ ते ३० वर्षे जुना स्लॅब अचानक कोसळला. या दुर्घटनेत आठ वाहनांचे नुकसान झाले असून, काही दुचाकी व रिक्षा नाल्यात कोसळल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस व नगरपालिकेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत परिसर सुरक्षित केला. काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यानंतर पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली.

नगराध्यक्षा वनश्री शेंडगे, मुख्याधिकारी अजय कुमार एडके व नगरसेवकांनी घटनास्थळी पाहणी केली. सुमारे २५ ते ३० वर्षे जुनी मोरी असून, मुसळधार पावसामुळे स्लॅबचा भाग खचल्याचा प्राथमिक अंदाज नगराध्यक्षा वनश्री शेंडगे पान २ वर

## ओहोळात बुडून मुलीचा मृत्यू

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील उसरोली-बेलवाडी आदिवासीवाडी येथील १७ वर्षीय अमृता अंकुश वाघमारे हिचा पानखोल ओहोळात बुडून मृत्यू झाला. या घटनेने बेलवाडी आदिवासीवाडीवर शोककळा पसरली आहे.

गुरुवारी (दि. ३०) सायंकाळी पाचच्या सुमारास अमृता ही आई रेखा अंकुश वाघमारे हिच्यासोबत खुबे पकडण्यासाठी पान २ वर

## कावडीत संसार; खांद्यावर मुलाचा भार

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

एका खांद्यावर संसाराचा गाडा, कावडीच्या एका टोकाला घरातील मोजके सामान आणि दुसऱ्या टोकाला चिमुकला... तर हातात डोंबारी खेळाचे साहित्य घेऊन पोटासाठी गावोगाव भटकणारे हे कुटुंब. शुक्रवारी पनवेलच्या गजबजलेल्या रस्त्यावर दिसलेले हे दृश्य अनेकांच्या काळजाला चटका लावून गेले.



(छायाचित्र : राजेश डांगळे)

डोंबारी खेळ दाखवून मिळणाऱ्या चार पैशांवर संसाराचा गाडा हाकणाऱ्या या कुटुंबाची जगण्यासाठीची धडपड या दृश्यातून प्रकर्षाने जाणवत होती. एका बाजूला कुटुंबाचे मोजके सामान, दुसऱ्या बाजूला लहान मुलाला कावडीत बसवून हा पिता पायी चालत होता. त्याच्यासोबत दुसरे चिमुकले मूलही पायी पान २ वर

## मॅरेथॉनसाठी माथेरानचा रस्ता बंद!

- रविवारी पहाटे साडेतीन तास वाहतुकीला ब्रेक
- माथेरानला येणाऱ्या पर्यटकांचे हाल होण्याची शक्यता

**। नेरळ । । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यातील धुक्याचा आनंद लुटण्यासाठी माथेरानमध्ये पर्यटकांची गर्दी वाढत असतानाच, रविवारी माथेरान हिल मॅरेथॉनमुळे पर्यटकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. माथेरान घाटरस्ता पहाटे ५ ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत म्हणजेच साडेतीन तास सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. पान २ वर

### टॅक्सी सेवाही बंद ठेवण्याचे आदेश

रविवारी पहाटे ५ ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मॅरेथॉनच्या पार्श्वभूमीवर टॅक्सी सेवेलाही सकाळी ५ ते ८ वाजेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे माथेरानकडे जाणाऱ्या पर्यटकांनी गर्दी आणि गैरसोय लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे.

## राज्यसभेचे कामकाज स्थगित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विरोधकांनी केलेल्या जोरदार घोषणाबाजी आणि गदारोळामुळे राज्यसभेचे कामकाज सोमवारी, ३ ऑगस्टपर्यंत स्थगित करण्यात आले. विरोधी पक्षाच्या खासदारांनी नियम २६७ अंतर्गत चर्चेची मागणी करत सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणाबाजी केली. सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी विरोधकांची मागणी फेटाळल्यानंतर गोंधळ आणखी वाढला. या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर राज्यसभेचे कामकाज सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी विरोधकांच्या गोंधळावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

## नवजात बाळाच्या मृत्यूप्रकरणी डॉक्टरांवर गुन्हा

### जे.जे. रुग्णालयातील पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीचा अहवाल



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान नवजात बाळाच्या मृत्यूप्रकरणी डॉ. प्रियल रवींद्र शेंडे यांच्याविरोधात अखेर अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई येथील पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या अहवालात डॉ. शेंडे यांच्यावर कर्तव्यावर हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

बेलोशी येथील सुष्मिता रुपेश काटले यांना १४ मे २०२२ रोजी प्रसूतीसाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रसूतीच्या वेळी त्रास वाढल्यानंतर ऑनड्युटी डॉक्टरांना बोलावण्यात आले. पान २ वर

> **डॉ. प्रियल शेंडे यांच्या हलगर्जीपणामुळे कोणतीही चूक नसताना मला माझे बाळ गमवावे लागले. माझे बाळ मला परत मिळणार नाही; मात्र या प्रकरणात कारवाई होण्यासाठी मदत केल्याबद्दल जे.जे. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर, अलिबाग पोलीस अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे मी मनापासून आभार मानते.**
>
> **– सुष्मिता काटले, पीडित माता**

## १६ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कोंडीची वाडी येथे पाण्यात बुडून सोळा वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना ३० जुलै रोजी सायंकाळी घडली. अभिषेक एलिया ढालवाणी (रा. अय्यप्पा मंदिराच्या पाठीमागे, सुकापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जुलै रोजी वाजेगावच्या पुढे बाबदेववाडी आणि कोंडीची वाडी ओव्हर ब्रिजखाली नदीच्या पान २ वर







# पनवेलमधून हजारो कार्यकर्ते जाणार

## वर्धापनदिनाला सात हजार भाकरी-भाजी, ठेचा नेण्याचा निर्धार

## बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार तयारी

। पनवेल । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचा ७९वा वर्धापन दिन २ ऑगस्ट २०२६ रोजी खालापूर येथे उत्साहात साजरा होणार असून, या सोहळ्यासाठी पनवेलमधून तब्बल चार हजार कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती कोकण शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिली. तसेच पनवेलमधून कार्यकर्त्यांसाठी सुमारे सात हजार भाकरी, भाजी आणि ठेचा नेण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी पनवेल येथे झालेल्या शेकापच्या ७८व्या वर्धापन दिनाच्या धर्तीवर यंदाही पनवेलमधील कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नारायण घरत, नूतन सभापती देवेंद्र गंगाराम मढवी, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, चिटणीस नगरसेवक प्रकाश म्हात्रे, पनवेल तालुका शेकापचे चिटणीस राजेश केणी, कार्यालयीन चिटणीस विलास फडके आदी पदाधिकारी तयारीला लागले आहेत.



३० जुलै रोजी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रभागांमध्ये बैठका घेण्यात आल्या. प्रभाग क्रमांक १ मध्ये राईस मिल भालचंद्र पाटील यांच्या निवासस्थानी, प्रभाग क्रमांक २ मध्ये विजय पाटील यांच्या कार्यालयात, प्रभाग क्रमांक ३ मध्ये रौफ शेख आणि अनंता पाटील यांच्या निवासस्थानी, प्रभाग क्रमांक ४ व ६ साठी जगदीश नावडेकर यांच्या निवासस्थानी, प्रभाग क्रमांक ५ मध्ये प्रतीक ढोबळे यांच्या निवासस्थानी, प्रभाग क्रमांक १४, १५ व १६ साठी केतन भगत यांच्या कार्यालयात, तर प्रभाग क्रमांक १७ ते २० साठी पनवेल मध्यवर्ती कार्यालयात बैठका पार पडल्या.

पनवेलच्या ग्रामीण भागातही वावंजे पंचायत समिती गणात डी.बी. म्हात्रे यांच्या निवासस्थानी, चिंद्रण गणात मोहन गोपी खानाव यांच्या निवासस्थानी, नेरे गणात चांगाशेठ उसाटकर-दुंदरे, आदई गणात शंकरबुवा फडके, विचुंबे गणात पुरुषोत्तम भोईर यांच्या निवासस्थानी, कोन गणात धर्मा पाटील हॉल, पलस्पे गणात मोहन गवंडी यांच्या निवासस्थानी बैठका घेण्यात आल्या. तसेच वडघर जिल्हा परिषद गणासाठी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव प्रकाश नाईक यांच्या वतीने विठ्ठल-रुक्माई मंदिर, कोल्ही येथे, तर गव्हाण जिल्हा परिषद गणासाठी समीर पाटील यांच्या कार्यालयात बैठक घेऊन कार्यकर्त्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# खालापूरमध्ये जनतेच्या हक्कांचा एल्गार

### ● सामील होण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतकरी, कष्टकरी, कामगार,वंचित आणि सर्वसामान्यांचा आवाज असणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन रविवारी (दि.२) खालापूरमध्ये साजरा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना पुरोगामी विचारांची मेजवानी या मेळाव्याच्या निमित्ताने मिळणार आहे. मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून, हजारो कार्यकर्ते सहभागी होतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. पुरोगामी विचारांचा, संघर्षाचा आणि जनतेच्या हक्कांचा प्रखर एल्गार या मेळाव्यात पाहावयास मिळणार असल्याची माहिती शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम यांनी दिली.



खालापूरमधील राष्ट्रीय महामार्गालगत जुन्या राशी पेट्रोल पंपाच्या विस्तीर्ण परिसरात मैदानात हा सोहळा साजरा केला जाणार आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्याचे हजारो कार्यकर्ते साक्षीदार बनणार आहे. या मेळाव्यातून विचारांची मेजवानी घेऊन संघटना अधिक भक्कम व मजबूत करण्यासाठी कार्यकर्ते सज्ज होणार आहेत. पुरोगामी विचारांचा, संघर्षाचा आणि जनतेच्या हक्कांचा प्रखर एल्गार या मेळाव्यात पाहावयास मिळणार आहे. कार्यकर्त्यांना याचा आनंद घेता यावा, यासाठी भव्य अशी तयारी करण्यात आली आहे.

कार्यक्रम सुरु होण्याअगोदरच खालापूरमधील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले जाणार आहे. त्यानंतर हातात लाल झेंडे घेऊन पक्षाचा जयघोष करीत मोठी अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. कार्यक्रम स्थळापर्यंत होणारी ही मिरवणूक ढोल ताशांच्या पथकाद्वारे निघणार आहे. या मिरवणूक असंख्य कार्यकर्ते, महिला, तरुण, तरुणी सहभागी होणार आहेत. कार्यक्रम स्थळापर्यंत पोहोचल्यानंतर मान्यवरांसह सर्व कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासूनचा इतिहास चित्रफितीद्वारे दाखविला जाणार असल्याची माहिती शिवानी जंगम यांनी दिली.

### पाच हजार वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था

शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्यामध्ये दहा हजारांहून अधिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. अलिबागपासून पनवेल, पोलादपूर, मुरूड, श्रीवर्धन अशा अनेक भागांतून कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी होणार आहे. वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी स्वतंत्र अशी पाच हजार वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. वेगवेगळ्या भागातून येणाऱ्या वाहनांची वेगवेगळी पार्किंग व्यवस्था असणार आहे. तसेच मोठ्या बससाठी एक स्वतंत्र पार्किंग व्यवस्था आहे. वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी योग्य नियोजन करण्यात आल्याचे शिवानी जंगम यांनी सांगितले.

## पान १ वरून

### महसूल अधिकाऱ्याचे ‘लँड कनेक्शन’ उघड?

यामुळे या भागातील जमिनींची मागणी प्रचंड वाढली आहे. याच संधीचा फायदा घेत काही अधिकारी शासकीय नियमांना बगल देत जमीन व्यवहार करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच इतर महसूल कार्यालयांतील काही अधिकाऱ्यांचा या व्यवहारांमध्ये सहभाग असल्याचा दावा करण्यात आला आहे. शासकीय नियमांनुसार महसूल व भू-अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांना कोणतीही जमीन किंवा स्थावर मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी शासन अथवा सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. तसेच शेतीची जमीन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या खरेदी करण्यावरही निर्बंध आहेत. जमीन खरेदी झाल्यास त्याची माहिती शासनाला देणेही बंधनकारक आहे. मात्र, या नियमांचे पालन न करता व्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांसह परराज्यातील व्यक्तींनीही अलिबाग परिसरात जमिनी खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या खरेदीमागील उद्देश काय, याबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. काही गावांमध्ये स्थानिकांनी अशा व्यवहारांना विरोध केल्याचेही सांगितले जाते. मात्र, राजकीय मध्यस्थीनंतर ही प्रकरणे शांत झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत खरेदीखताद्वारे झाले असले, तरी शासकीय नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे ते बेकायदेशीर असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित जमीन व्यवहारांची सखोल चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

### शहीद निलेश तुणतुणेंचा आज स्मृतिदिन

शहीद जवानाला मानवंदना देण्यात येणार आहे. कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे, जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल राहुल माने, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, जिल्हा होमगार्ड माजी समादेशक ॲड. के.डी. पाटील, शहीद निलेश तुणतुणे ट्रस्टचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, गटविकास अधिकारी शर्मिला पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, रायगड जिल्हा परिषद शाळेसह माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडून लेझीम व कलापथकाचे सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

### ४३७ मूर्तिकार उद्ध्वस्त

पुन्हा उभारी घेईल, अशी प्रतिकिया मूर्ती कारखानदारांकडून करण्यात येत आहे. पेणच्या गणेशमूर्तींना केवळ रायगड किंवा महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशात मोठी मागणी आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मूर्तिकार वर्षभर मेहनत घेऊन बाप्पाच्या विविध आकर्षक मूर्ती साकारतात. यंदाही गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर मूर्ती तयार करण्यात आल्या होत्या. मात्र, मुसळधार पावसाने मूर्तिकारांच्या वर्षभराच्या मेहनतीवर क्षणार्धात पाणी फेरले. पेण शहरासह जोहे, कळवे, शहापूर, तांबडशेत परिसरातील गणेश कला केंद्रांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही तयार मूर्ती पाण्यात वाहून गेल्या, तर काहींचे रंग उडाले. शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या अनेक मूर्ती पाण्यात भिजून अक्षरशः विरघळून गेल्या. रंगकामाचे साहित्य, साचे, कच्चा माल आणि इतर उपकरणांचेही नुकसान झाले आहे. गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक असताना मूर्तिकारांसमोर आता ग्राहकांच्या ऑर्डर वेळेत कशा पूर्ण करायच्या, हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. नुकसान भरून काढण्यासाठी अनेक कारखानदारांनी कामाचे तास वाढवून दिवस-रात्र मूर्ती पूर्ण करण्याची धडपड सुरू केली आहे.

**पावसाने मोडली घडी; शासनाच्या मदतीची आस**

आधीच कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, वाहतूक खर्च आणि बाजारातील स्पर्धेमुळे अडचणीत असलेल्या मूर्तिकारांवर अतिवृष्टीने आणखी मोठे संकट ओढवले आहे. प्रशासनाने ४३७ कारखानदारांचे नुकसान झाल्याची माहिती दिली असून, शासनाने तातडीने पंचनामे करून योग्य आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मूर्तिकारांकडून होत आहे.

मुसळधार पावसामुळे कारखान्यांमध्ये पाणी शिरले. रंग, साचे आणि इतर साहित्याचे नुकसान झाले. अनेक मूर्ती वाहून गेल्या, तर शाडूच्या मातीच्या मूर्ती पाण्यात विरघळल्या. कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्राहकांना वेळेत बाप्पाच्या मूर्ती कशा द्यायच्या, ही चिंता आहे. गणपती हा आमच्यासाठी केवळ व्यवसाय नाही, तर श्रद्धा आणि आस्थेचा विषय आहे. शासनाने तातडीने मदत केली तर या संकटातून पुन्हा उभे राहण्याचे बळ मिळेल. - दीपक समेळ, मूर्तिकार

### रोह्यात दमखाडी नाक्यावर स्लॅब कोसळला

यांनी व्यक्त केला. दरम्यान, दुर्घटनेमुळे एका इमारतीचा पाणीपुरवठा खंडित झाला असून नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात येणार आहे. संबंधित ठेकेदाराला तातडीने दुरुस्तीचे आदेश देण्यात आले असून, काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. दमखाडी नाका हा शहरातील अत्यंत वर्दळीचा परिसर असल्याने या घटनेनंतर शहरातील जुन्या मोऱ्या, पूल व नाल्यांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### भिवंडीत इमारत कोसळली

बचावकार्य सुरू आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री साडेअकराच्या सुमारास अचानक मोठा आवाज झाला आणि इमारतीचा काही भाग कोसळला. दुर्घटनेनंतर परिसरात एकच घबराट पसरली. शेजारील ए-विंगमधील रहिवाशांनी तातडीने इमारतीबाहेर धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, ठाणे आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशामक दल, पोलीस तसेच भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेची पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगारा हटवून अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्याचे काम रात्रभर सुरू होते. मात्र रिमझिम पाऊस आणि अरुंद रस्त्यांमुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत.

बचाव पथकांनी ढिगाऱ्याखालून आतापर्यंत नऊ मृतदेह बाहेर काढले आहेत. त्यापैकी पाच जणांची ओळख पटली असून, शमीम शेख (३२), रंजीत सिंग (४५), मिराज रसूल शेख (३४), संतोष कुमार पांडे (४२) आणि शमीम अन्सारी (३०) अशी त्यांची नावे आहेत. अन्य तिघांची ओळख अद्याप पटलेली नाही. ढिगाऱ्याखाली आणखी काही रहिवासी अडकले असण्याची शक्यता असल्याने बचाव पथकांकडून शोधमोहीम सुरूच आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### नवजात बाळाच्या मृत्यूप्रकरणी डॉक्टरांवर गुन्हा

मात्र, डॉ. प्रियल शेंडे रुग्णालयात उपस्थित नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. बाळाचे डोके प्रसूतीमार्गात अडकल्यानंतरही वेळेत आवश्यक उपचार न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचे सुष्मिता काटले यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात २०२२ मध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी वैद्यकीय कागदपत्रे तज्ज्ञ समितीकडून तपासून घेण्यासाठी सर जे.जे. रुग्णालयाकडे पाठविली होती. २७ जुलै २०२६ रोजी समितीचा अहवाल पोलिसांना प्राप्त झाला. अहवालाच्या आधारे डॉ. प्रियल शेंडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या अहवालाने प्रकरणाला कलाटणी तज्ज्ञ समितीच्या अहवालात प्रसूतीच्या वेळी कर्तव्यावर उपस्थित राहणे आवश्यक असतानाही डॉ. शेंडे गैरहजर राहिल्याचे आणि त्यामुळे आवश्यक उपचार वेळेत न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

जन्माच्या अगोदरच डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे अनेक कोवळ्या जीवांना प्राण गमवावे लागल्याच्या घटना घडत आहेत. सर्वसामान्यांच्या बालकांच्या जीवाला किंमत नाही का? शासनाने या गंभीर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करणे गरजेचे आहे. - ॲड. राकेश नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्ते

### १६ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

पात्रामध्ये अभिषेक ढालवाणी आणि त्याचे चार मित्र फिरण्यासाठी गेले होते. कोंडीची वाडी ब्रिजच्या खालील नदीपात्रात पोहण्यासाठी ते उतरले. अभिषेकला पोहता येत नव्हते. यावेळी पाण्यात त्याचा पाय घसरला आणि तो बुडाला. चारही मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस आणि अग्निशामक दलाला देण्यात आली. पोलीस आणि अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अभिषेकला बाहेर काढले. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता.

### कावडीत संसार; खांद्यावर मुलाचा भार

चालत होते. डोक्यावर छप्पर नाही, हातात कायमचा रोजगार नाही; उद्याची भ्रांत असतानाही लेकरांच्या पोटासाठी रस्त्यावरची वाट धरावी लागत आहे.महागाई आणि रोजगाराच्या अनिश्चिततेच्या काळात डोंबारी खेळ करून मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची वेळ या कुटुंबावर आली आहे. पावसाळ्यात ओल्या रस्त्यांवरून मुलांना घेऊन केलेला हा प्रवास त्यांच्या जगण्याची कठीण बाजू दाखवून देतो.

शहराच्या झगमगाटात विकासाच्या उंच इमारती उभ्या राहत असताना, त्याच रस्त्यावर कावडीत संसार घेऊन फिरणारे हे कुटुंब गरिबीचे अस्वस्थ करणारे वास्तव दाखवून जाते. पोटाची खळगी भरण्यासाठी सुरू असलेली ही धडपड पाहून अनेक नागरिकांच्या डोळ्यांत नकळत पाणी आले.

### मॅरेथॉनसाठी माथेरानचा रस्ता बंद!

त्यामुळे रविवारी माथेरानकडे जाणाऱ्या पर्यटकांना नेरळमध्येच थांबावे लागण्याची शक्यता असून, नेरळमध्ये मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

माथेरानच्या ८०० मीटर उंचीवरील डोंगररांगांमध्ये विविध धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याच पार्श्वभूमीवर माथेरान हिल मॅरेथॉनचा दुसरा अंक रविवारी (दि. २) रंगणार आहे. यंदा स्पर्धेचा मार्ग बदलण्यात आला असून, कल्याण-नेरळ-कर्जत मार्गावरील सीमा रिसॉर्ट येथून स्पर्धेला सुरुवात होणार आहे. देशभरातून सुमारे ४०० स्पर्धक या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत. २१.१ किलोमीटरची अर्धमॅरेथॉन पहाटे ५ वाजता सुरू होईल. सीमा रिसॉर्ट, माणगाव फाटा, नेरळ, हुतात्मा चौक, माथेरान घाट, जुम्मापट्टी, दस्तुरी असा मार्ग पार करून स्पर्धक पुन्हा माथेरान घाट उतरून नेरळमार्गे सीमा रिसॉर्ट येथे पोहोचणार आहेत. १५ किलोमीटरच्या स्पर्धेतील स्पर्धक जुम्मापट्टी येथून परतीचा मार्ग धरतील. मॅरेथॉनच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिस आणि वाहतूक विभागाकडून घाटरस्त्यावर वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे रविवारी माथेरानला मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. विशेषतः नेरळ स्थानक आणि परिसरात पर्यटकांची गर्दी होऊन वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे.

### ओहोळात बुडून मुलीचा मृत्यू

पानखोल ओहोळाजवळ गेली होती. अमृता मतिमंद असल्याने तिच्या आईने तिला ओहोळाच्या काठावर बसवून खेळण्यासाठी दगडी गोटा दिला आणि ती खुबे पकडण्यासाठी पाण्यात गेली. दरम्यान, खेळण्यासाठी दिलेला दगडी गोटा पाण्यात पडल्याने तो आणण्यासाठी अमृता पाण्यात उतरली. यावेळी ती पाण्यात बुडून गुदमरल्याने तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी मुरुड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मेंगाळ पुढील तपास करीत आहेत.

### गांजा, हेरॉईनचा लाखोंचा साठा जप्त

मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पथक तयार करून सायंकाळीच वरसोली समुद्रकिनारी पाठविले. रात्री साडेनऊच्या सुमारास संशयास्पदरीत्या फिरणारा इसम पोलिसांच्या निदर्शनास आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता, तपकिरी रंगाच्या हेरॉईनची ६५ पाकिटे आणि २.०६ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी हा संपूर्ण साठा जप्त केला. ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव रामविनय प्रसाद रामस्वरूपदास यादव (४६, रा. बिहार) असे आहे. त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अंमली पदार्थांचा साठा नेमका कोठून आणण्यात आला, तसेच यामागे मुख्य सूत्रधार कोण आहे, याचा पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान, आरोपीला शुक्रवारी (दि. ३१) दुपारी अलिबाग न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि यशवंत कदम करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकती आहेत, या मिळकतीचे मालक १. राधेश्याम केदारलाल मुंदडा २. मनिष जवाहरलाल गिल्डा ३. रणजीत सिंग भवरलाल कांकरेचा ४. निखिल नितीन मुणोथ ५. बिपिन चंद्रकांत मुणोथ व ६. स्नेहा बिपिन मुणोथ यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|
| ०१ | ७/१/ब | ००-१७-०० या एकूण क्षेत्रापैकी ००-१६-९२ इतके क्षेत्र | १-८० |
| ०२ | ७/१/क | ००-७८-९० | ८-३८ |
| ०३ | १२ | ००-७७-४० या एकूण क्षेत्रापैकी ००-६३-४१ इतके क्षेत्र | ८-४६ |
| ०४ | १५ | ००-१८-७० | १-०० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१ ऑगस्ट २०२६

ॲड. शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१
मो.नं.९५२७२८२५२५



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
रायगड विभाग, पेण.

**निविदा सुचना क्रमांक ०४ सन २०२६-२७**

विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण हे शासकीय नोंदणीकृत/अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. सदरील स्थापत्य कामांचा खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

निविदा सादर करताना पुढील कागद पत्रे आवश्यक आहेत. :१. आयकर प्रमाणपत्र २. सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र ३. पॅन कार्ड ४. मागील किमान तीन वर्षामध्ये केलेल्या कामाचें कार्यादेश व कामपूर्णत्वाचा दाखला / अनुभवाचे दाखले ५. आवश्यक यंत्र सामग्री तपशिल व मशिनरी बाबतचे दाखले ६.जी.एस.टी. नोंदणी दाखला

**कामांचा तपशिल खालील प्रमाणे :**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टी विरहीत | कामाची अनामत रक्कम १ टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम ४ टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रोहा आगारामध्ये काही भागास पेवींग ब्लॉक बसविणे. | ८,१३,६५२.४२ | ८१३७.०० | ३२५४६.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | रा.प माणंगाव आगाराच्या प्रवेशद्वारावळ पेवींग ब्लॉक बसविणे | ८,१३,६५२.४२ | ८१३७.०० | ३२५४६.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ३ | रा.प रायगड विभागातील ०८ आगारातील जनरेटर शेडला तारेचे कुंपन करणे | ७,१८,६८०.४० | ७१८७.०० | २८७४७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ४ | रा.प अलिबाग आगारा अंतर्गत येणारे पोयनाड उप-डाऊनचे पिकअप शेडचे प्लास्टरींग व कलरींग करणे | ५,४६,३५३.११ | ५४६४.०० | २१८५४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ५ | विभागीय कार्याशाळा येथील प्रवेशद्वारा जवळील गटार बांधणे | २,५१,०३९.३६ | २५१०.०० | १००४२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ६ | अलिबाग बसस्थानकाच्या पार्कींग आवारास पेवींग ब्लॉब बसवीणे | ८,२५,१६५.१२ | ८२५२.०० | ३३००७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ७ | रामवाडी बसस्थानकावरील छताच्या पत्र्याची दुरूस्ती करणे | ८,३५,१८२.२१ | ८३५२.०० | ३३४०७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ८ | रामवाडी येथील रा.प १०० वसाहतीमधील सदनिकेचे छत व स्ट्रक्चरल स्टिलची दुरूस्ती करणे | २,५१,५५८.७७ | २५१६.०० | १००६२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ९ | अलिबाग आगारातील आगार व्यवस्थापक व प्रशानासन शाखेवरील पत्र्याची दुरुस्ती करणे | ३,०३,१७०.४० | ३०३२.०० | १२१२७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| १० | रामवाडी येथिल MIG रा.प वसहातीमधील रूम,०३, १४,०६ ची दरवाजा चेंबर दुरुस्ती, रंगकाम, प्लास्टरींगचे काम करणे बाबत एकूण रक्कम (अ+ब+क)= | (अ) ५९७६४.२९ (ब) ५६९६८.६६ (क) ५९७६४.२९ (ड)१,७६,४९७.२४ | १७६५.०० | ७०६०.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ११ | वडखळ बसस्थानक येथील बसस्थानक येथे प्लंब कॉक्रींट व कंपाऊड वॉलची दुरुस्ती करणे. | ८३,७५३.२८ | ८३८.०० | ३३५०.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-

कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - दि.०३.०८.२०२६ ते १७.०८.२०२६ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत

निविदा सादर शेवट ची तारीख- दि. १७.०८.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत

निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. १७.०८.२०२६ वेळ -१६:०० वा. पर्यंत ( शक्य असल्यास )

कामपुर्ण करण्याची मुदत- १ ते ७ कामाकरीता ६ महिने व काम नं.८ व ११ करीता ३ महिने व काम नं. ९ करीता ४ महिने

टीप :-१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.

विभागीय अभियंता
राज्य परिवहन रायगड विभाग



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कुदे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरेश धर्मा वावेकर रा. रुम नं.१२०२, १२ वा मजला, सी-लिंग, पवनपुत्र नारळी आग्रीपाडा को.ऑप. हौ. सोसायटी, १८ वा रोड, खार- पश्चिम, मुंबई ४०० ०५२ यांच्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कुदे ता.अलिबाग | ३३० | १-२२-०० पो.ख.०-१०-१० एकूण १-३२-१० | २३.४७ |

या मिळकतीपैकी श्री.सुरेश धर्मा वावेकर यांचे नांवे ताबेकब्जा वहिवाटीतील असलेले क्षेत्र ०-५३-८० हे.आर., पो.ख. ०-१०-१० हे.आर., एकूण क्षेत्र ०-६३-९० हे. आर., आकार रु. १०.३५ पैसे या मिळकतीपैकी ०-४०-०० हे.आर. मिळकतीपैकी

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक ३०/०७/२०२६
अशिलाची सही.

सही / -
ॲड. विवेक रमेश साळवी
शॉप नं.५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
ता.अलिबाग, जि.रायगड



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कलोते रयती, ता. खालापुर, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक जयश्री विजय पाटील यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कलोते रयती, ता.खालापुर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| गट नं/हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ३९/१/अ | ११०-००-०० | ११००.०० |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०८ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

खालापूर,
तारीखः ०१/०८/२०२६

ॲड. कोंडे देशमुख
पनवेल



### पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०७/२६९/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३१/०७/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री/श्रीमती.
मा. सदस्य/ सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल,

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.७, शुक्रवार दिनांक ०७/०८/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ‘‘आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०७, दिनांक ०७/०८/२०२६ ची विषयपत्रिका**

**मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :-**

विषय क्र.१ स्थायी समिती सभा ठराव क्र.१०७, दिनांक ०७/०७/२०२६ अन्वये पनवेल महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणेबाबत.

**(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )**

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

**महापालिका भवन, पनवेल**
दिनांक :-३१/०७/२०२६.



### जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फ सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे :-

**मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| चेंढरे | ५/२/ब | ०.४०.३० | ८.०७ |

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गणेश नरेश पालवणकर, श्री. महेश नरहरी कुंभार, श्री. संदेश नरहरी कुंभार, श्रीमती. आशा वसंत बिरवाडकर, सौ.पौर्णिमा संजय मांडलेकर, श्रीमती ज्योती नरहरी कुंभार आणि सौ. नेहा देवेंद्र नागोटणेकर, मु. चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. गणेश नरेश पालवणकर, श्री.महेश नरहरी कुंभार, श्री. संदेश नरहरी कुंभार, श्रीमती आशा वसंत बिरवाडकर, सौ.पौर्णिमा संजय मांडलेकर, श्रीमती ज्योती नरहरी कुंभार आणि सौ. नेहा देवेंद्र नागोटणेकर यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ७ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २६.०७.२०२६

(ॲड.व्हि.जी.माळी)
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## निवडक

### सिमेंटच्या जंगलात मोराचे नृत्य

**खांदा कॉलनी :** उरण शहरातील कुंभारवाडा परिसरात भर पावसाळ्यात एका मोराने घराच्या छतावर पिसारा फुलवून मनमुराद नृत्य केल्याचे दुर्मीळ दृश्य नागरिकांना पाहायला मिळाले. या अनोख्या क्षणाचा आनंद घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मुसळधार पावसाच्या सरी सुरू असतानाच मोराने आपला आकर्षक पिसारा फुलवून नृत्य सुरू केले. मोराचे हे मोहक रूप पाहून अनेकांनी मोबाईलमध्ये छायाचित्रे व व्हिडिओ चित्रित केले. नागरिकांच्या मते, हा मोर जवळील नेव्हल (नेव्ही) परिसरातील डोंगरमाथ्यावरून उरण शहरात आला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सिमेंट-काँक्रीटच्या वाढत्या जंगलात वन्यजीवांचे दर्शन दुर्मीळ झाले असताना, उरणमध्ये मोराचे असे मुक्त संचार आणि पावसातील नृत्य नागरिकांसाठी एक वेगळाच अनुभव ठरला. या दृश्याने निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनाची गरज पुन्हा अधोरेखित झाली असून, अशा पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास जपण्याची जबाबदारी सर्वांनी स्वीकारावी, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.





### रुग्णालयातील स्वच्छतेबाबत मनसेचे निवेदन

**महाड :** महाड उपजिल्हा रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्थेबाबत नागरिकांकडून सातत्याने व्यक्त होत असलेल्या तक्रारी, स्वच्छता व्यवस्थेतील कथित गैरकारभार तसेच कामगार कायद्यांचे होत असलेले उल्लंघन या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी मनसेच्यावतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. शंतनू डोईफोडे यांना निवेदन देण्यात आले. मनसेचे महाड तालुकाध्यक्ष मंगेश शिंदे, अमोल दळवी, पंकज उमासरे यांनी वैद्यकीय अधीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेऊन रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्था तातडीने सुधारण्याची मागणी केली. याशिवाय, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दर्जेदार व स्वच्छ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी नियमित स्वच्छता, देखरेख आणि प्रभावी नियोजनाची अंमलबजावणी तातडीने करावी, अशी मागणीही करण्यात आली. दरम्यान, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शंतनू डोईफोडे यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित मुद्द्यांची योग्य ती तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# रस्ता रुंदीकरणासाठी तोडलेली झाडे लावणार कोण?

- अलिबाग-नागाव बायपास रस्ता अखेर पूर्ण
- वृक्षारोपणाचे आश्वासन अद्याप कागदावरच

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग-नागाव बायपास परिसरातील रस्ता रुंदीकरण व काँक्रीटीकरणाच्या कामासाठी रस्त्यालगत असलेली अनेक वर्षे जुनी झाडे तोडण्यात आली. रस्त्याचे काम आता पूर्णत्वास आले असले, तरी तोडण्यात आलेल्या झाडांच्या जागी नव्याने वृक्षारोपण कधी होणार, हा प्रश्न सध्या स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विकासकामे आवश्यक असली, तरी त्यासाठी पर्यावरणाचा समतोल बिघडू नये आणि भकास करून विकास नको, अशी भूमिका नागावकरांनी यापूर्वीही मांडली होती.

रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे ही केवळ हिरवाईची प्रतीक नव्हती, तर उन्हाळ्याच्या दिवसांत प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांसाठी नैसर्गिक सावलीचा आधार होती. या झाडांमुळे परिसरातील तापमान नियंत्रणात राहण्यास मदत होत होती. मात्र, रस्ता रुंदीकरणाच्या कामादरम्यान ही झाडे तोडण्यात आली. त्यावेळी स्थानिक नागरिकांनी पर्यावरणाच्या दृष्टीने चिंता व्यक्त करत, रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याच परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात यावे, अशी मागणी केली होती.

स्थानिकांकडून आवाज उठविल्यानंतर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर पुन्हा वृक्षारोपण करण्यात येईल, असे आश्वासन संबंधितांकडून देण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मात्र, रस्त्याचे काम पूर्ण होऊन काही कालावधी लोटला तरी अद्याप त्या ठिकाणी अपेक्षित स्वरूपात वृक्षारोपण झालेले दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विकास कामासाठी झाडे तोडली गेली, तर त्याची भरपाई केवळ कागदावरील वृक्षारोपणाने न होता, प्रत्यक्षात झाडे लावून ती जगविण्याची जबाबदारीही संबंधित यंत्रणांनी स्वीकारणे गरजेचे आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

रस्ता झाला, विकास झाला; आता हिरवाईही परत येणार का? हा नागावकरांचा थेट सवाल असून, संबंधित विभागाने याची गांभीर्याने दखल घेत रस्त्यालगत तातडीने वृक्षारोपण करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखत नागाव परिसराचा शाश्वत विकास साधावा, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

#### पावसाळा संपण्यापूर्वी वृक्षारोपणाची मागणी

सध्या पावसाळा सुरू असल्याने वृक्षारोपणासाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर विलंब न करता, योग्य नियोजन करून रस्त्यालगतच्या उपलब्ध जागेत स्थानिक हवामानाला अनुरूप झाडांची लागवड करावी आणि त्यासाठी आवश्यक संरक्षण व्यवस्था उभारावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

#### झाडे जगविण्यासाठी अथक मेहनत

विशेष म्हणजे, या परिसरात यापूर्वी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासाठी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या अनुयायांनी पुढाकार घेतला होता. वृक्षारोपण केल्यानंतर त्यांना नियमित पाणी देणे, झाडांची निगा राखणे आणि त्यांचे संवर्धन करणे, यासाठी स्वयंसेवकांनी सातत्याने मेहनत घेतली होती. अनेक झाडे मोठी होऊन परिसराला सावली देऊ लागली होती. मात्र, विकासकामाच्या प्रक्रियेत ही झाडे हटविण्यात आली.



## नगरपंचायतीच्या इमारतीच्या कामाला मुहूर्त मिळेना

- भूमिपूजन होऊन सहा महिने उलटले
- काम मात्र अद्याप रखडले

| तळा | प्रतिनिधी |

नागरी सेवा व सुविधा अंतर्गत तळा शहरासाठी मंजूर झालेल्या तळा नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. या कामाचे भूमिपूजन दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दि.५ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या दिमाखात करण्यात आले होते. मात्र, सहा महिने उलटूनही केवळ भूमिपूजनाचेच फोटो शिल्लक असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. राज्य शासनाने नागरी सेवा व सुविधा योजना अंतर्गत तळा शहराच्या विकासासाठी नगरपंचायतीची स्वतंत्र इमारत बांधण्यास मान्यता दिली होती.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले होते. त्यावेळी लवकरात लवकर काम सुरू होऊन १८ महिन्यात इमारत पूर्ण होईल, असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु, जानेवारी ते जुलै असा कालावधी उलटूनही जागेवर एकही वीट रचली गेलेली नाही. केवळ जुनी इमारत पाडून जागा सपाट करण्यात आली आहे.

याबाबत नगरपंचायत प्रशासनाकडे विचारणा केली असता, निधी वितरण आणि टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन वर्क ऑर्डर निघालेली आहे. लवकरच कामाला सुरुवात होईल असे उत्तर मिळाले.



## मानवनिर्मित कचरा प्राण्यांच्या जिवावर

### गुरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम

| कोलाड | प्रतिनिधी |

मानवाचा हलगर्जीपणामुळे तसेच पर्यावरणाबाबत असलेल्या उदासिनतेमुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन प्रचंड प्रमाणात बिघडत चालले असल्याने ते प्राणी मात्रारांच्या जिवावर उठत असल्याचे पाहाव्यास मिळत आहे. प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी असून देखील त्याचा बेसुमार वापर आपणाकडून केला जात आहे. बाजारातील दुकानदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक पिशव्यांचा काम झाल्यावर ते कुठेही फेकून दिल्या जात आहेत. यामुळे आपल्या सभोवताली प्लॅस्टिक पिशव्यांचे साम्राज्य वाढत असल्याचे दिसून येत आहे.

उकिरडे तर प्लॅस्टिक पिशव्याने भरलेले आहेत.त्या उकिरड्यावर गुरे-ढोरे चरावयास येतात त्यावेळी उकिरड्यातील खाद्य पदार्थांबरोबर प्लॅस्टिकचे ही भक्षण त्यांच्याकडून केल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

आपल्या निष्काळजी पणामुळे पर्यावरणातील ठिकठिकाणी घाणीच्या साम्राज्यावरील प्लॅस्टिक गुरा-ढोरांच्या जिवावर उठत आहे. उकिरड्यावरील प्लॅस्टिक पोटात गेल्याने गुरे ढोरे व इतर प्राणी मात्राला मात्र भयंकर त्रास सहन करावा लागत असुन प्लॅस्टिक पिशव्या पोटात गेल्याने पचन क्रियेसह रवंथ क्रियेवर देखील परिणाम होत आहे. तर प्लॅस्टिक पोटात गेल्याने गुरे ढोरे दगावली जात असल्यामुळे शेतकरी वर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे.





## न दिसणारी दृश्ये

दिल्लीतील जेन झीच्या आंदोलनाने राष्ट्रीय राजकारणाला हादरा दिला आहे. भाजप कदाचित यानंतरही निवडणुका जिंकेल. पण त्याचा पाया खचला आहे. पायाखालची वाळू सरकू लागली आहे. आजवर धर्माच्या नावाने तरुण पिढीला नादाला लावले गेले. तिला गृहित धरले गेले. पण ती आता एकदम कोशातून बाहेर आली. तिच्या या दणक्याने आज नाहीतर उद्या राष्ट्रीय राजकारणात बदल करावे लागणार हे उघड आहे. केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये बदल होणार अशा वावड्या कितीतरी दिवसांपासून उडत आहेत. मोदी राजवट म्हणजे एक कडेकोट किल्ला आहे. त्यात आतल्या गोष्टी कधीच बाहेर येत नाहीत. मोदी व अमित शहा यांच्या मनात काय चालले आहे याचा कोणालाही थांगपत्ता लागत नाही. पण तीन मंत्र्यांची राज्यसभेची मुदत वाढवलेली नाही. परिणामी त्यांची मंत्रिपदे जाणार आहेत. दुसरे म्हणजे तूर्तास शिक्षणमंत्रिपद दिलेले प्रल्हाद जोशी यांच्याकडे आधीपासूनच बरीच खाती आहेत. एक तर त्या खात्यांचे वाटप करावे लागेल. किंवा शिक्षण खात्यासाठी नवा उमेदवार शोधावा लागेल. दिल्ली आंदोलनानंतर चंद्राबाबू नायडूंच्या तेलुगू देसम पक्षात अस्वस्थता असेलच. कारण, अमेरिकेत शिक्षण वा नोकरीसाठी जाणाऱ्यांमध्ये सर्वाधिक तरुण तेलुगू असतात. यातले अनेक जेन झींचे पाठीराखे आहेत. तिकडे नीतीशकुमार यांचा जनता दलही स्थितीवर लक्ष ठेवून असेल. दिल्लीखालोखाल सर्वात जास्त उग्र आंदोलन बिहारमध्येच झाले. तिथे तर भाजपच्या कार्यालयांवर, झेंड्यांवर खुलेपणाने हल्ले करण्यात आले. तरुण पिढी भाजपवर संतापलेली आहे याचे दर्शन बिहारमध्ये घडले. अशा वेळी पलटूराम नीतीशकुमार सावध झाले असतील यात शंका नाही. तिकडे मध्य प्रदेशातील शेतकरी मूग पिकाची सरकारी भावात शंभर टक्के खरेदी करावी या मागणीसाठी उग्र आंदोलन करीत आहेत. त्याने राज्य सरकार अडचणीत सापडले आहे. विशेष म्हणजे केंद्रात कृषी खाते मध्य प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्याकडे आहे. जेन झीपासून प्रेरणा घेऊन शेतकरीही वेगवेगळ्या रीतीने आंदोलने करू लागले आहेत.

### राममंदिर भानगडीचा फटका

उत्तर प्रदेशात पुढील वर्षी निवडणुका आहेत. तिथे योगी आदित्यनाथ यांची चांगली पकड दिसत असली तरी गेल्या लोकसभेला भाजपला सर्वाधिक दणका इथूनच बसला होता. जेन झी आंदोलनामध्ये उत्तर प्रदेशातून दलित व मुस्लिम विद्यार्थी खूप मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. खासदार चंद्रशेखर आझाद यांची सेना सध्या जोरदार सक्रीय आहे. राममंदिरामध्ये झालेल्या भानगडीमुळे खूप मोठ्या वर्गाचा भ्रमनिरास झाला आहे. अगदी तळाच्या वर्गातील अंधभक्तांनाही तोंड लपवावे लागत आहे. अलिकडे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात नव्याने तपास पथक स्थापण्यास सांगितले आहे. त्या तपासावर न्यायालयाचे लक्ष राहणार आहे. त्यातून आणखी भानगडी समोर आल्या तर भाजपला ते गैरसोयीचे असेल. पेपरफुटीची अनेक प्रकरणे उत्तर प्रदेशात घडली आहेत. तिथल्या पोलिस भरती, शिक्षक भरतीच्या परीक्षा एकतर पुढे ढकलाव्या लागल्या आहेत किंवा त्यांचे निकाल आलेले नाहीत. याच दरम्यान इकडे प्रिय अमुचा महाराष्ट्रही अस्वस्थता आहे. पण ही अस्वस्थता पडद्याआड लपवली जात आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे काही खासदार फोडले व आपल्यात सामील करून घेतले. किंवा खरे तर तसे करण्यास अमित शहा यांनी त्यांना तशी परवानगी दिली. तेव्हापासून शिंदे फुरफरत आहेत. त्यांना आपल्या मुलाला म्हणजे श्रीकांतला मंत्री करायचे आहे. वारंवार दिल्लीला जाऊन ते अमित शहा यांच्याशी आपल्या संबंधांचा खुंटा बळकट करून घेत असतात. पण आता मोदी आणि शहांनाच धक्का बसलेला असल्याने समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर ज्या तातडीने देवेंद्र फडणवीसांना दिल्लीला बोलावण्यात आले ते पाहता मोठे बदल घडू पाहत आहेत. फडणवीस दिल्लीला जाणार अशा चर्चा अनेक दिवस चालू आहेत. ते स्वतः याला तयार नाहीत हे उघड आहे. मुंबईत ते राजे आहेत. ते राजपद सोडून दिल्लीतील मोदींच्या हाताखालची मनसबदारी स्वीकारणे त्यांना फारसे आवडणारे नाही. पण वरून आदेश आला की तो पाळावाच लागेल.

### अस्वस्थ महाराष्ट्र

देशाची आर्थिक स्थिती ठीक नाही. आता लोक विसरले आहेत. पण काही दिवसांपूर्वी खुद्द मोदींनीच लोकांना सोने खरेदी करू नका, पेट्रोल कमी वापरा वगैरे आवाहन केले होते. त्यानंतर इराण युध्दात शस्त्रसंधी होईल असे वाटले. परिस्थिती सुधारली. पण आता ती पुन्हा बिघडली आहे. दिल्लीत जमलेल्या तरुणांचे आईबाप किंवा त्यांची पिढी संसाराचे गाडे ओढून थकू लागली आहे. त्यांना दिलासा देणे मोदींना अशक्य बनले आहे. याला जबाबदार धरून निर्मला सीतारामन बाईंना हटवले जाईल अशी जोरदार शक्यता दिल्लीच्या वर्तुळात व्यक्त होते. यापूर्वी प्रकाश जावडेकर, रविशंकर प्रसाद, अनुराग ठाकूर, स्मृती इराणी यांना याच रीतीने नारळ दिला गेला होता. आज त्यांचे नामोनिशाणही कुठे शिल्लक नाही. याच रीतीन बदल होण्याची शक्यता असून देवेंद्रांना केंद्रात महत्वाचे पद दिले जाण्याची शक्यता आहे. या स्थितीची चाहूल लागलेल्या शिंद्यांच्या हालचाली वाढल्या आहेत. पण आता खुद्द त्यांच्या पक्षातली स्थिती अस्थिर आहे. चार दिवसांपूर्वी शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांची बैठक घेतली व कामे करायची नसतील तर बाजूला व्हा असा दम भरला, असे म्हणतात. संजय शिरसाट, प्रकाश आबिटकर, दादा भुसे, आशिष जयस्वाल इत्यादी मंत्र्यांविषयी त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली असेही सांगतात. तशा बातम्या आल्या आहेत व त्यांचा अजून तरी इन्कार झालेला नाही. लाडकी बहीण योजनेमध्ये प्रचंड भानगडी झाल्याचे उघड झाले आहे. हजारो महिलांचे पैसे बंद झाले आहेत. पैसे वेळेवर मिळण्याचेही वांदे आहेत. कंत्राटदार संघटना पैसे मिळत नसल्याबद्दल जाहीर आंदोलने करीत आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम इत्यादी खात्यांबाबत तक्रारी आहेत. ही बहुतेक खाती शिंद्यांकडे आहेत. शिरसाट वगैरेंच्या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर सारवासारव करताना शिंद्यांची दमछाक होते आहे. अर्थात, शिरसाट यांची प्रकरणे भाजपवाले किंवा फडणवीसच मुद्दाम बाहेर आणत आहे असेही म्हटले जाते. ते काहीही असले तरी शिंदे गटाला अस्वस्थ करतील अशाच या बाबी आहेत. शिंदे गट हा केंद्राच्या एनडीएमधील दोन क्रमांकाचा गट होणार तितक्यात बंगालमधील तृणमूलच्या फुटीर गटाने एकदम वीस खासदार बाजूला आणून शिंद्यांचे महत्व खलास केले. त्यातच राष्ट्रवादी एक होण्याची एक टांगती तलवार आहेच. तसे झाले व शरद पवार यांच्या हातात अप्रत्यक्ष सूत्रे गेली तर थेट मोदींसोबत संबंध असलेला एक तगडा प्रतिस्पर्धी शिंद्यांसमोर उभा राहणार आहे. दरम्यान, देवेंद्र केंद्रात गेले तर महाराष्ट्र भाजपचीही घडी बदलावी लागणार आहे. त्या स्थितीत शिंदे यांना कोण्या ज्युनिअर नेत्याच्या हाताखाली उपमुख्यमंत्री म्हणून काम करावे लागू शकते. कॅरमचा बोर्ड फुटल्यानंतर सोंगट्या विखुरतात व नंतर सर्व खेळाडूंना संधी उपलब्ध असते. इतके दिवस स्थिर वाटणार महाराष्ट्राच्या राजकारणाचा पटही आता फुटतो की काय असा अस्वस्थ आहे. न दिसणारी दृश्ये समोर येतात का पाहावे लागणार आहे.

---

विचार

# सत्ताबदलाची आशा की नव्या निराशा?

प्रा. जयसिंग यादव

> ***नेपाळमध्ये सध्याचे आंदोलन हे एका सरकारच्या विरोधापुरते मर्यादित नाही, तर लोकांच्या अपेक्षा आणि शासनाच्या कामगिरीतील वाढलेल्या अंतराचे प्रतीक आहे. परिवर्तनाचे स्वप्न पाहणाऱ्यांनाच आज पुन्हा रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ती कोणत्याही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. नेपाळने ही परिस्थिती सुधारण्याची संधी न मानल्यास अस्थिरतेचे चक्र पुन्हा सुरू होण्याचा धोका कायम राहील.***

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह (बालेन शाह) यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले.

आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पहायला मिळाली. त्यामुळे नेपाळमध्ये आता थेट व्यवस्थेविरुद्ध आणि आश्वासनांचा भंग करणाऱ्या नेतृत्वाविरुद्ध लढा सुरू झाला आहे. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. आंदोलक आणि विरोधक आता त्यांना 'काळा चष्मा' काढून जनतेची खरी परिस्थिती पाहण्याचे आवाहन करत आहेत. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.

नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. याशिवाय, नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. शाह यांच्या अनपेक्षित आणि काहीशा लहरी परराष्ट्र धोरणामुळे भारतासोबतच्या सीमावादाचे विषय पुन्हा उफाळून आले होते. आता त्यांच्याच देशात सुरू असलेल्या यादवीमुळे या द्विपक्षीय संबंधांमध्ये अधिक गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नेपाळमधील सद्यस्थिती ही दक्षिण आशियातील तरुण पिढीच्या आक्रोशाचे आणि लोकशाही व्यवस्थेकडून असलेल्या अवास्तव अपेक्षेचे प्रतीक आहे. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल.

दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते. नेपाळने गेल्या काही वर्षांमध्ये दक्षिण आशियातील सर्वाधिक वेगाने बदलणारे राजकारण अनुभवले आहे. पारंपरिक राजकीय पक्षांविरुद्ध तरुणांनी उभा केलेला जनक्षोभ, भ्रष्टाचाराविरोधातील संताप, बेरोजगारी, प्रशासनातील उदासीनता आणि नव्या नेतृत्वाविषयी निर्माण झालेली प्रचंड अपेक्षा या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर शाह यांच्या नेतृत्वाला मोठा जनाधार मिळाला; मात्र अवघ्या काही महिन्यांमध्ये त्याच तरुणांपैकी मोठा वर्ग रस्त्यावर उतरला आहे. ज्यांनी बदलाची स्वप्ने पाहून नव्या नेतृत्वाला सत्तेपर्यंत पोहोचवले, तेच आता सरकारच्या विरोधात उभे राहिल्याने नेपाळच्या लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अलीकडील आंदोलनाची ठिणगी एका तरुणाच्या आत्मदहनाच्या घटनेतून पडली असली, तरी त्यामागे दीर्घकाळ साचलेला सामाजिक आणि राजकीय असंतोष आहे. भूमिहीनांच्या बेदखलीच्या कारवाया, पोलिसांच्या कथित कठोर वर्तनाविरोधातील नाराजी आणि शासनाच्या निर्णयप्रक्रियेबद्दलचा रोष एकत्र येत आंदोलनाचे व्यापक रूप घेत गेले.

शाह यांचा उदय हा नेपाळच्या पारंपरिक राजकारणावरील अविश्वासाचा परिणाम होता. दीर्घकाळ सत्तेत राहूनही प्रमुख पक्ष बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई आणि प्रशासनातील अकार्यक्षमता दूर करू शकले नाहीत. त्यामुळे 'सोशल मीडिया'वर सक्रिय, थेट संवाद साधणारे आणि पारंपरिक राजकीय घराण्यांपासून दूर असलेले शाह हे बदलाचे प्रतीक बनले. विशेषतः 'जनरेशन-झेड'ने त्यांच्याकडे एका नव्या राजकीय संस्कृतीच्या आशेने पाहिले. निवडणुकीतील त्यांचा विजय हा केवळ राजकीय नव्हता, तर नेपाळमधील तरुणांच्या अपेक्षांचा विजय मानला गेला; मात्र सत्ता मिळवणे आणि सत्ता चालवणे यात मोठा फरक असतो. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारकडून लोकांच्या अपेक्षा अत्यंत मोठ्या होत्या. भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई, पारदर्शक प्रशासन, रोजगारनिर्मिती, सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा आणि सामाजिक न्याय या आघाड्यांवर जलद परिणाम दिसतील, अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात प्रशासनातील जटिलता, आर्थिक मर्यादा आणि धोरणात्मक अडथळ्यांमुळे अपेक्षित वेगाने बदल घडू शकले नाहीत. यामुळे समर्थकांमध्येच निराशा वाढू लागली. नेपाळमधील सध्याचे आंदोलन ही केवळ एका घटनेविरोधातील प्रतिक्रिया नाही. ते विश्वासभंगाचे आंदोलन आहे. लोकशाहीत जनतेचा पाठिंबा कामगिरीवर टिकून राहतो, हे या घटनांमधून स्पष्ट होते. नेपाळमध्ये बेरोजगारी हे अजूनही मोठे आव्हान आहे. मोठ्या प्रमाणावर नेपाळी युवक रोजगारासाठी परदेशात जात आहेत. देशांतर्गत उद्योग आणि गुंतवणुकीचा वेग अपेक्षेइतका वाढलेला नाही. महागाई, अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमांमुळे अनेक कुटुंबांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

चर्चा आजची

# परीक्षा पद्धतीत बदल करण्याची संधी

सुयोग आंग्रे

भारताची परीक्षा प्रणाली आजकाल सर्वात मोठ्या मंथनातून जात आहे. अलीकडेच, नीटची प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे २३ लाख विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द करावी लागली. याच्या निषेधार्थ दिल्लीपासून देशभरात व्यापक विद्यार्थी आंदोलने झाली. उत्तरदायित्वाच्या मागणी दरम्यान, शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला आणि एनटीएच्या ४७ अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले.१९९१ च्या आर्थिक संकटाने जसे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी नवीन दरवाजे उघडले, त्याचप्रमाणे २०२६ चे परीक्षा संकट भारतीय परीक्षा प्रणालीला एकविसाव्या शतकाशी सुसंगत बनवण्याची संधी देऊ शकते, जर आपण दूरदृष्टीने मोठा विचार केला तरच हे शक्य आहे. प्रस्तावित मॉडेल जेईई मेनच्या धर्तीवर मल्टी-शिफ्ट सीबीटीचे आहे, ज्यामध्ये प्रत्येक शिफ्टच्या सर्व उमेदवारांना समान विहित प्रश्नपत्रिका मिळेल. हीच रचना २०२१ मध्ये उल्लंघनाचा बळी ठरली आहे. जेईई मेन २०२१ पूर्णपणे संगणकावर आधारित होते, तरीही सोनीपतमधील एका परीक्षा केंद्रावर बाहेर बसलेले सॉल्व्हर्स 'रिमोट एक्सेस' सॉफ्टवेअरद्वारे उमेदवारांच्या प्रश्नपत्रिका सोडवत होते. सीबीआयच्या तपासानुसार प्रति उमेदवार १२ ते १५ लाख रुपये जमा झाले. सॉफ्टवेअरमध्ये छेडछाड केल्याबद्दल एक रशियन हॅकर देखील पकडला गेला, ज्याचा कथितपणे ८०० हून अधिक उमेदवारांना फायदा झाला.पक्की प्रश्नपत्रिका आणि असुरक्षित यंत्रे तशीच राहिल्यास चोरीचा मार्ग बंद होणार नाही, उलट कागदावरून पडद्यावरच सरकणार आहे. संसदेच्या स्थायी समितीने असेही म्हटले आहे की एनटीएने २०२४ साली घेतलेल्या १४ परीक्षांपैकी पाच परीक्षा विस्कळीत झाल्या होत्या. त्यामुळेच आपल्याला संपूर्ण परीक्षा पद्धतीत बदल करावे लागतील, कारण संगणकावर आधारित परीक्षा हा रामबाण उपाय नाही. अमेरिकेच्या जीआरइ सारख्या चाचण्या केवळ 'संगणकावर' घेतल्या जात नाहीत, तर त्या अनुकूल असतात. यामध्ये प्रत्येक उमेदवाराला एका मोठ्या एनक्रिप्टेड प्रश्नपेढीतून वेगळी परंतु समान कठीण पातळीची प्रश्नपत्रिका मिळते आणि वर्षभर परीक्षा घेतली जाते. त्याचप्रमाणे सन २०२४ पासून सॅट पूर्णपणे डिजिटल-ॲडॉप्टिव्ह झाला आहे. यामध्ये कोणत्याही दोन उमेदवारांचे प्रश्न सारखे नसल्यामुळे 'पेपर लीक'ला वाव नाही. अशा परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणी आणि 'लॉक-डाउन' टर्मिनल असतात ज्यावर कोणतेही बाह्य सॉफ्टवेअर चालू शकत नाही.ब्रिटनची यूसीएटी ही देखील संगणकावर आधारित परीक्षा आहे, परंतु तिचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते रॉट ज्ञानापेक्षा उमेदवाराच्या निर्णय क्षमतेचे मूल्यांकन करते. आपल्या देशाविषयी बोलायचे झाले तर कॅट परीक्षा देखील अनेक वर्षांपासून संगणक आधारित, मल्टी-शिफ्ट प्रणाली अंतर्गत यशस्वीपणे आयोजित केली जात आहे आणि त्यात कोणतेही मोठे उल्लंघन दिसले नाही. म्हणजेच समाधानाचा मार्ग आपल्यासमोर आहे आणि तो अनाकलनीयही नाही. देशात घेतल्या जाणाऱ्या परीक्षा स्मरणशक्तीचे मूल्यमापन करतात, प्रतिभेचे नाही. देशाच्या भावी डॉक्टरांची निवड करणारी परीक्षा उमेदवाराने किती जीवशास्त्र लक्षात ठेवले आहे हेच पाहिले जाते. तर त्याची परीक्षा यापूर्वीच बोर्डात झाली आहे. रुग्णाच्या वेदना समजून घेण्याची सहानुभूती, त्वरीत शिकण्याची क्षमता आणि दबावाखाली योग्य निर्णय घेण्याची बुद्धी आहे की नाही याची चाचणी नीट परीक्षा देत नाही. एका प्रतिष्ठित संस्थेच्या लर्निंग सिस्टीमने ५८ हजार कोटी रुपयांच्या कोचिंग उद्योगाला जन्म दिला आहे, ज्यासाठी अनेक पालकांना कर्ज घ्यावे लागत आहे. 'एक दिवसाचा जुगार' आजही तसाच आहे. फक्त स्क्रीनवर चाचणी आयोजित केल्याने यापैकी कोणतीही समस्या आपोआप दूर होणार नाही. सर्व प्रथम सीबीटी अनुकूल केले पाहिजे. यासाठी राष्ट्रीय एन्क्रिप्टेड प्रश्नपेढी तयार करावी आणि प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळी परंतु समतुल्य अडचण पातळीची प्रश्नपत्रिका मिळावी, जी परीक्षा सुरू होताच परीक्षा केंद्राच्या टर्मिनलवर तयार असावी. यासोबतच प्रत्येक केंद्राचे स्वतंत्र सुरक्षा लेखापरीक्षण, बायोमेट्रिक पडताळणी आणि रिमोट ॲक्सेसवर पूर्ण बंदी याची खात्री करावी. खेड्यापाड्यात आणि शहरांमध्ये परीक्षा केंद्रांचे विस्तृत जाळे उभारले जावे आणि मोफत मॉक परीक्षा उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून डिजिटल डिव्हाईड कोणत्याही ग्रामीण प्रतिभाला गिळंकृत करता येणार नाही याकडे बारकाईने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रत्येक प्रमुख परीक्षा वर्षातून दोन किंवा तीन वेळा आयोजित केली जावी आणि उमेदवाराचा फक्त सर्वोत्तम गुण वैध मानला जातो. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटण्याचा काळाबाजार थांबेल. सहानुभूती आणि निर्णयाचे मूल्यांकन करणारे परिस्थिती-आधारित प्रश्न आणि मुलाखती निवडक डॉक्टरांना जोडल्या पाहिजेत. नागरी सेवा परीक्षेतही वस्तुस्थिती लक्षात ठेवण्यावरील अवलंबित्व कमी करून केस स्टडीवर आधारित प्रश्न वाढवले पाहिजेत. काही प्रश्नही ओपन-बुक असावेत. परीक्षेची प्रश्नपत्रिका जी स्मरणशक्तीची नसून विचार आणि आकलनाची असेल, ती फुटली तरी फसवणूक करणाऱ्यांना विशेष फायदा होणार नाही आणि रॉट लर्निंगवर आधारित कोचिंग उद्योगही कमी होऊ लागेल. २०२४ च्या सार्वजनिक परीक्षा कायदा १० वर्षांपर्यंत कारावास आणि १ कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. गरज आहे ती त्याची काटेकोर आणि न्याय्य अंमलबजावणीची. प्रत्येक परीक्षेपूर्वी सॉफ्टवेअरचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट असावे आणि मूल्यांकनामध्ये डबल-ब्लाइंड ऑन-स्क्रीन चाचणीची तरतूद असावी, ज्यामध्ये एआय अतिरिक्त त्रुटी आणि चुकलेली उत्तरे ओळखण्यात मदत करेल. आजचा भारत उत्तम शिक्षण, विश्वासार्ह परीक्षा प्रणाली आणि रोट-आधारित परीक्षा पद्धतीपासून स्वातंत्र्याची मागणी करत आहे.यासाठीच देशाच्या राजधानीत तरुणांनी पुकारलेले ऐतिहासिक विजयाचे आंदोलन करण्यात आले. देश स्वतंत्र झाल्यानंतर शैक्षणिक व्यवस्थेमध्ये अमूलग्राबद्दल होत गेले. आज शिक्षण एक गोरखधंदा बनला आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये सुरू असलेल्याभ्रष्टाचाराचा पाढा वाचला तर कोणे एके काळी आपल्या भारतात जगप्रसिद्ध विद्यापीठे होती हे पचनी पडत नाही.

---

लोकसंसद

## अजिंक्य रहाणेची निवृत्ती मनाला चटका लावणारी

मैदानावर आणि मैदानाबाहेरही अत्यंत मृदू, शांत आणि संयमी स्वभावाचा असलेल्या आणि खऱ्या अर्थाने 'क्रिकेट हा सभ्य गृहस्थांचा खेळ' या व्याख्येला जागलेल्या अजिंक्य रहाणेने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याची बातमी मनाला चटका लावून गेली. खरे तर भारतीय क्रिकेटमध्ये त्याचे अफाट योगदान होते. पण अनेक खेळाडूंना खराब फॉर्मातही अनेक संधी दिल्या गेल्या असताना अजिंक्यला त्याच्या कारकिर्दीत निवड समितीने अनेकदा संघाबाहेर ठेवले आणि योग्य न्याय दिला नाही. २०२०-२१ च्या ऐतिहासिक ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जेव्हा भारतीय संघ ॲडलेड कसोटीमध्ये अवघ्या ३६ धावांवर बाद झाला तेव्हा अजिंक्यने विराटच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व सांभाळले. स्वतः मेलबर्नमध्ये शतकी खेळी केली आणि नवख्या खेळाडूंच्या बळावर भारताला 'बॉर्डर-गावस्कर चषक' जिंकून दिला. क्रिकेट इतिहासातील आजवरचा हा सर्वात मोठा विजय मानला जातो. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याचे योगदान अतुलनीय राहिले. मुंबई क्रिकेटला पुन्हा गतवैभव मिळवून देत त्याने त्याच्या नेतृत्वाखाली मुंबईला २०२३-२०२४ मोसमात ४२वे रणजी विजेतेपद मिळवून दिले. अजिंक्यचे व्यक्तिमत्व सचिन, विराट किंवा रोहित यांच्यासारखे ग्लॅमरने भरलेले आणि प्रसिद्धीच्या झगमगाटाचे नव्हते तर आदर आणि विश्वासाचे होते. अजिंक्य, तुझी भारताची कसोटी कॅप क्रमांक २७८ आता निरोप घेत असली तरी तुझ्या कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांच्या मनात आणि भारतीय क्रिकेटच्या इतिहासात तिचे स्थान कायम 'अजिंक्य' राहणार आहे. पुढील वाटचालीस तुला शुभेच्छा!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

दिनविशेष

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०६ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा गावी आले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पददलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०६ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ ऑगस्ट
१) श्री. महादेव रामा भगत
बामणगाव, अलिबाग १-८-१९४०
२) श्री. गजानन धर्मा मढवी
चेंढरे, अलिबाग, १-८-१९५०
३) श्री. अशोक नथू काकडे
पिंपळभाट, अलिबाग, १-८-१९५६
४) श्री. रामकृपाल प्रसाद जयस्वाल
अलिबाग, १-८-१९५८

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दिपाली दिनानाथ पाटील**
**वाढदिवस, अलिबाग**

# मानवी हक्काचे नायक अण्णाभाऊ साठे

**संजीव मोरे**

१ ऑगस्ट हा दिवस अण्णाभाऊंचा जयंती दिवस. शोषितांचा आक्रोश शब्दातून मांडणाऱ्या थोर समाज सुधारक लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना प्रथम नमन करूया. मित्रहो, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर उभी राहिलेली आहे अशी एक दंतकथा आम्ही रूढ केलेली आपण पाहतो. परंतू वास्तव तसे नसून पृथ्वी शेतकरी, कष्टकरी, कामगार, दलित, शोषित आदिवासी यांच्या तळहातावर तरलेली आहे असा वास्तववादी सिद्धांत अण्णाभाऊ साठे यांनी मांडून पहिला प्रहार त्यांनी अंधश्रद्धेवर केला आहे आणि परंपरेने जे खुळ समाज मनावर रूजवले होते त्याचे खंडन करून देवदेवतांच्या नावावर असलेला ७/१२ प्रथमच त्यांनी मानव जातीच्या नावावर केला आहे. अशा क्रांतीकारक विचारांना जन्म देणारे साहित्यिक म्हणजे अण्णाभाऊ साठे होत. समाजाच्या रूढी परंपरेचा बळी ठरलेले अण्णा केवळ दिड दिवस शाळेत गेले. परंतू त्याला उत्तर म्हणून त्यांनी ३५ कादंबऱ्या, १३ कथा संग्रह, १४ लोकनाट्य, १८ प्रवासवर्णने, १०० पेक्षा जास्त पोवाडे, अनेक गणगौळण, वगनाट्य, पटकथा, अनेक लावण्या असे ग्रामीण ढंगाचे लिखाण करणारे अण्णाभाऊंचे हे काम एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. अण्णांची लेखणी म्हणजे वंचित, शोषित आणि उपेक्षितांची व्यथा मांडणारी तळपती तलवार होती. ते एका ठिकाणी लिहितात - नैराश्य हे तलवारीवर साठलेल्या धुळीसारखं आहे. धुळ झटकली की तलवार जशी आपल्या मुळ रूपात येते तसेच माणसानेही आपणास आलेले नैराश्य झटकून जीवनात येणाऱ्या संघर्षासाठी तयार असले पाहिजे.



अण्णाभाऊंचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात असलेल्या वाटेगावचा. हा महान साहित्यिक अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मांग समाजात जन्माला आले. लहानपणापासूनच त्यांना अन्यायाची चिड होती. त्याचाच परिणाम म्हणून १९४२ साली झालेल्या चलेजाव चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटीश सरकारने अण्णांना पकडण्यासाठी अटक वारंट काढले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांना प्रत्येक दिवशी जगण्यासाठीचा संघर्ष करावा लागला. घरात अठराविश्व दारिद्र्य असल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी वयाच्या ११ व्या वर्षीच त्यांना वाटेगाव ते मुंबई हे ३५० कि.मी. अंतर अनवाणी पायाने चालत जाऊन मुंबई गाठावी लागली. तशाही परिस्थितीत कोणत्याही कामाची तमा न बाळगता त्यांनी खाणकामगार, गिरणी कामगार, कोळसा वाहणारा, झाडू मारणारा, श्रीमंतांची कुत्री सांभाळणारा, मुंबईच्या गल्लोगल्ली आवाज देत कपडे विकणारा अशी एक ना अनेक कामे अण्णांना करावी लागली. परंतू अशाही परिस्थितीत आपल्यामधील शाहिर त्यांनी कधीही मरू दिला नाही. मुंबईमध्येच त्यांचा लोकशाहिर म्हणून पुढे नावलौकिक झाला. अण्णांच्या तडफदार लेखणीने आणि बुलंद आवाजाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी समाजमनच पेटवून दिले. त्यांचा ‘माझी मैना गावाकडे राहिली’ हा पोवाडा संयुक्त महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या वस्तुस्थितीचे वर्णन करणारा असल्यामुळे खूपच गाजला. अण्णांनी आपल्या रशिया प्रवासाच्या अनुभवावर आधारित ‘माझा रशियाचा प्रवास’ हे पुस्तक लिहिले. त्यांच्या मनावर कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रामुख्याने पगडा होता.

सन १९४८ मध्ये त्यांना पॅरिसमध्ये होणाऱ्या शांतता परिषदेचे आमंत्रण मिळाले. म्हणून त्यांनी तेथे जाण्यासाठी शासनाकडे पासपोर्ट मागणीसाठी अर्ज केला. पण मुंबई सरकारच्या दृष्टीने ते त्यांचे विरोधक होते. म्हणून त्यावेळी मुंबईचे मुख्यमंत्री असलेले बाळासाहेब खेर म्हणाले, खरं तर तुम्ही नशिबवान आहात. आम्ही तुम्हांला तुरूंगात टाकत नाही हेच तुमच्या दृष्टीने खूप महत्वाचं आहे. म्हणून तुम्ही शांत रहा. तुम्हांला पासपोर्ट वगैरे काही मिळणार नाही. राज्यकर्त्यांच्या अशा या नकारात्मक विचारसरणीमुळे एका दलिताला त्यांची क्षमता असूनदेखील सरकारच्या संकुचित मनोवृत्तीमुळे पॅरिस येथे होणाऱ्या शांतता परिषदेला मुकावे लागले, हे खेदाने नमूद करावे लागते. अखेर १९६१ मध्ये पुन्हा त्यांना रशियामध्ये जाण्याची संधी प्राप्त झाली. त्यांच्या शिष्टमंडळात त्यावेळी अनेक डॉक्टर होते. आमदार खासदार होते. मोठमोठे व्यापारी होते. प्रत्येक क्षेत्रातील नामवंतांचे ते शिष्टमंडळ अभ्यास दौऱ्यासाठी रशियात गेले होते. अण्णाभाऊ मास्कोमध्ये असताना तेथील जनतेसमोर त्यांना भाषण करण्याची संधी प्राप्त झाली असता अण्णाभाऊंनी भाषणाच्या सुरवातीलाच असे म्हटले की, मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातून आलो आहे आणि पहिल्यांदाच साता समुद्राच्या पलिकडे पोवाड्याच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख करून दिली. त्यांचे शौर्य, त्यांची राज्यकारभाराची पद्धत, त्यांचे समानतेचे तत्व या रशियन जनतेला करून दिली. अण्णाभाऊंच्या अनेक कादंबऱ्या ह्या रशियन भाषेत भाषांतर झाल्यामुळे रशियन जनतेला अण्णाभाऊ लेखक म्हणून भावले व ते अतिशय प्रसिद्ध झाले. त्यामुळे त्यांच्या भाषणाच्या वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असे. अण्णाभाऊंची ही प्रसिद्धी पाहून त्यांच्या शिष्टमंडळातील इतर सहकारी आश्चर्यचकित झाले होते. दिड दिवस शाळेत गेलेल्या व्यक्तीने रशियन जनतेच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते हे अविश्वसनीय होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या चळवळीमध्ये अण्णाभाऊंचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी लालबावटा कला पथकाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली. संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. म्हणून मुंबईसह महाराष्ट्र आपल्या पदरात पडला. म्हणून आज मोठ्या अभिमानाने आपण ‘‘जय महाराष्ट्र’’ म्हणू शकतो. तसेच गोवा मुक्तीसाठी अण्णाभाऊंनी गोव्याकडे चला नावाचा पोवाडा रचला आणि गोवा मुक्तीसाठी देखील फार मोठे योगदान दिले आहे. तसेच आजचा बीड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, संभाजीनगर, धाराशिव असे नऊ जिल्हे मिळून आजचा मराठवाडा तयार झालेला आहे. हाच मराठवाडा निजामाच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी जे मोठे आंदोलन झाले त्याही आंदोलनात अण्णाभाऊंचे योगदान फार मोठे आहे. अण्णाभाऊंची ही कामे आपल्या डोळ्यात अंजन घालणारी आहेत. कारण अण्णा दलित होते. परंतु ते बुध्दीने गुलाम नव्हते. ते जातीयवादी नव्हते. ते तर्कवादी होते. ते विवेकवादी होते आणि नेहमी देश प्रथम या विचारांना प्राधान्य देऊन काम करणारे खरे भारतीय होते. भारत हा कृषीप्रधान देश आहे असे आपल्याला पाठ्यपुस्तकांमधून शाळा महाविद्यालयामधून शिकवलं जातं ते खरंही आहे, पण भारत केवळ कृषीप्रधानच नाही तर तो जातीप्रधान देखील आहे. भारतीय संविधानामुळे, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांमुळे माणसाला पोतराज न बनवता राजपुत्र बनवण्याची ताकद ज्यांच्या साहित्यात आहे त्यांचे नाव अण्णाभाऊसाठे आहे. समस्त मानवमुक्तीचा लढा अविरतपणे प्रज्वलित ठेवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरे बहुजनांचे उद्धारक आहेत हे अण्णाभाऊंना ज्ञात होते. त्यांच्याच विचारांचा वसा, वारसा घेवून अण्णाभाऊ समाजमन परिवर्तनाचे काम करत राहिले.

अशा या बहुआयामी अष्टपैलू व्यक्तीमत्वाला त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या पवित्र आणि पावन स्मृतींना विनम्र अभिवादन आणि कोटी-कोटी प्रणाम.

## लक्ष्मीबाई कांबळे यांचे निधन

**उरण :** उरण शहरातील इंदिरानगर येथील लक्ष्मीबाई बब्रुवान कांबळे (६२) यांचे शनिवार दि.२५ जुलै रोजी निधन झाले. त्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्या असून सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती दरवर्षी साजरी करण्यामागे त्यांचे योगदान आहे. उरण शहरातील अनेक समस्या मार्गी लावण्याचे काम त्यांच्या हातून घडले. त्यांच्या अंत्ययात्रेस मोठा जन समुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले आणि एक मुलगी नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.५ ऑगस्ट रोजी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले.





## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**| वावोशी | प्रतिनिधी |**

श्री छत्रपती विद्यालय, वावोशी येथे शाळा सल्लागार समितीच्या वतीने इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. हा समारंभ मंगळवार, दि.२९ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून विद्यालय व पालकांचे नाव उज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. इयत्ता १२ वीतील विशाखा मोरे, साधना चव्हाण, सुप्रिया बर्गे, सायली पवार, कविता ढेबे आणि प्रीती गौतम तसेच इयत्ता १०वीतील योगिनी खरिवले, अक्षत मोरे, पूर्वा उदेकर आणि आर्या देरकर या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

## खारघरमध्ये अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

### ●सिडकोची धडक कारवाई

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

खारघर नोडमधील वाहतूक कोंडी आणि अनधिकृत अतिक्रमणांबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत सिडको महामंडळाने मोठी निष्कासन मोहीम राबविली. या मोहिमेत सेक्टर ४० आणि सेक्टर ३७ परिसरातील एकूण १८ अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवून ती हटविण्यात आली.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत दि.२८ जुलै रोजी सेक्टर ४० येथील बागेश्री सोसायटीसमोरील तसेच नाल्यालगत उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणी वाहतुकीस अडथळा ठरत असलेले ७ स्टॉल्स,



१ सर्व्हिस सेंटर आणि १ गॅरेज शेड निष्कासित करण्यात आले.

याच मोहिमेदरम्यान खारघर सेक्टर ३७ मधील भूखंड क्र.-१ वर विनापरवानगी सुरू असलेली १ नर्सरी, ५ गॅरेज, २ फर्निचर दुकाने आणि १ ढाबा अशी एकूण ९ अनधिकृत बांधकामेही हटविण्यात आली.

सिडकोच्या माहितीनुसार, संबंधित सर्व बांधकामे महामंडळाच्या प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून तसेच कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल नोडचे नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईत नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षारक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी सहभाग घेतला.

## महासंचालकांची कर्जतच्या कृषी संशोधन केंद्राला भेट

**| खोपोली | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे महासंचालक राहुल रंजन महिवाल (भा.प्र.से.) यांनी बुधवारी (दि.२९) कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला भेट देऊन विविध संशोधन विभागांची पाहणी केली. केंद्रात सुरू असलेले भात संशोधन, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक उपकरणांची माहिती घेत केंद्राच्या कार्याचे कौतुक केले.



भेटीदरम्यान सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांनी महासंचालकांना भात वाण संग्रहालयाची माहिती दिली. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या व शिफारस केलेल्या विविध सुधारित आणि संकरित भात जातींसह जलद भात पैदास कार्यक्रम, संशोधन प्रकल्प, प्रयोगशाळांतील अत्याधुनिक उपकरणे आणि त्यांची कार्यक्षमता याविषयी सविस्तर माहिती सादर करण्यात आली.

यानंतर आयोजित आढावा बैठकीत डॉ. भरत वाघमोडे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महासंचालक राहुल महिवाल यांचे स्वागत केले. तसेच प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या संशोधन कार्याचा आणि विविध उपक्रमांचा आढावा सादर केला. यावेळी मार्गदर्शन करताना महासंचालक राहुल महिवाल म्हणाले की, संशोधन क्षेत्रात कार्यरत शास्त्रज्ञांच्या संशोधनवृत्तीला सातत्याने प्रोत्साहन देण्याची गरज आहे. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने केलेले संशोधन वाखाणण्याजोगे असून, येथील भात संशोधनामुळे देशातील भात शेतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या वतीने नेरळ ग्राम पंचायतमधील सफाई कर्मचारी यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. पावसाळ्यात प्रतिकूल परिस्थितीतही नागरिकांच्या आरोग्याची आणि परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई कामगारांसाठी ही मोठी आवश्यक वस्तू समजली जात आहे. १०० कर्मचाऱ्यांच्या नेरळ ग्रामपंचायतमध्ये मनसे रोजगार विभागाच्या वतीने केलेल्या या मदतीबद्दल जिल्हा अध्यक्ष सतीश कालेकर यांचे कौतुक होत आहे. हा उपक्रम मनसे अध्यक्ष राज ठाकरे, युवा नेते अमित ठाकरे तसेच रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे अध्यक्ष महेंद्र बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर आयोजित केला जात आहे. सफाई कर्मचारी दिवसभर स्वच्छता राखण्याचे काम करतात. त्यांच्या सेवेला प्रोत्साहन देण्याबरोबरच पावसाळ्यात त्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे जिल्हा अध्यक्ष सतीश कालेकर यांनी स्पष्ट केले.

## ‘ड्रग फ्री मुंबई’ अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने ड्रग फ्री मुंबई जनजागृती अभियानाअंतर्गत गुरुवार दि.३० जुलै रोजी पनवेल रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती कार्यक्रम पार पडला. क्यूआर कोड स्कॅनकरून अंमली पदार्थविरोधी शपथ घेण्यासह रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली.

नवीन बुकिंग हॉल परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात रेल्वे पोलीस अधिकारी व कर्मचारी, रेल्वे प्रवासी, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला




दक्षता समितीचे सदस्य, पोलीस मित्र आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपस्थितांनी क्यूआर कोड स्कॅन करून ड्रग फ्री मुंबईची शपथ घेत अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृतीचा संदेश दिला.

त्यानंतर सर्व सहभागींच्या उपस्थितीत रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली. या अभियानाचा उद्देश अंमली पदार्थमुक्त मुंबई घडविणे, रेल्वे प्रवाशांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पत्रकार मित्र परिवारातर्फे शैक्षणिक साहित्य

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील पत्रकार मित्र परिवार यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणाऱ्या अनोखा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षात माणगाव तालुक्यातील विविध प्राथमिक शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये रायगड जिल्हा परिषद शाळा जुने माणगाव, सुरव तर्फे तळे, सुरव तर्फे निजामपूर, उमरोली तर्फे खरवली, महादपोली आदिवासीवाडी, निवी आदिवासीवाडी, माकटी आदिवासीवाडी, व उच्च प्राथमिक शाळा दाखणे या शाळेतील सुमारे १२० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले यामध्ये तीन विषयांच्या वह्या, पेन, पेन्सिल, रबर, गिरमीट, चित्रकला वही, स्केचिंग पेन, स्कूल बॅग आदी साहित्यांचा समावेश होता.

या कार्यक्रमासाठी पत्रकार मित्र परिवाराचे सदस्य प्रमोद जाधव, परेश, शिंदे, गिरीश गोरेगावकर, वैभव सत्वे, सुनिल दळवी, नचिकेत म्हापसेकर यांनी महत्वाची भूमिका बजावली.

### १०२ रुग्णवाहिकासाठी ‘कॅशलेस पेट्रोकार्ड’ | आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

# आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाची नवी क्रांती

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्यातील आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, कॅशलेस पेट्रोकार्ड उपक्रम हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे १०२ रुग्णवाहिका सेवांचे व्यवस्थापन अधिक सक्षम होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला. मुंबईतील आरोग्य सेवा आयुक्तालय येथे आयोजित कार्यक्रमात कॅशलेस पेट्रोकार्ड उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आरोग्य सेवा आयुक्त, संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, सहसंचालक




सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत, उपसंचालक जयंत मुळे, तसेच दूरदृष्य प्रणालीद्वारे संचालक विजय कंदेवाड व राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि हिंदुस्थान पेट्रोकेमिकल लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा ही सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवनदायी व्यवस्था आहे. या सेवांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून, विश्वासार्ह आणि पारदर्शक व्यवस्था उभारणे गरजेचे आहे. पेट्रोकार्डसारख्या अभिनव उपक्रमामुळे रुग्णवाहिकांच्या इंधन खरेदी व्यवस्थापनासह आर्थिक पारदर्शकता येईल व कामकाजातील अनावश्यक विलंब कमी होईल. आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक होतील आणि संपूर्ण यंत्रणा अधिक उत्तरदायी बनेल.

यापूर्वी १०२ रुग्णवाहिकेची सेवा माता व बालकांसाठी वापरात होती. यापुढे १०२ रुग्णवाहिका सर्व रुग्णासाठी उपलब्ध करून देण्यात येत असून, ही सेवा अधिक प्रभावी, सक्षम करुन १०८ रुग्णवाहिकेला पर्यायी व्यवस्था तयार करावी, अशा सूचना आरोग्य मंत्र्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातील शासकीय वाहनाना वेळेत इंधन उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आरोग्य सेवेला नवी दिशा देणारा कॅशलेस पेट्रोकार्ड हा अभिनव उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. या माध्यमातून राज्यातील ३१९५ रुग्णवाहिकांना एचपीसीएल कंपनीचे कॅशलेस पेट्रोकार्ड देण्यात येणार आहे.

> “भविष्यातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.
> – प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्यमंत्री”

## निवडक



### महिलांना मोमोज बनवण्याचे प्रशिक्षण

**रोहा** : महिलांच्या हाताला रोजगार मिळावे व महिला स्वावलंबी होण्यासाठी छोटासा व्यवसाय सुरू करण्याच्या दृष्टीने बँकेच्या वतीने महिलांना संधी देण्यात आली. दमखाडी गावातील बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलांना रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक रोहा शाखेकडून व्यावसायिक कर्ज मिळण्याची संधी उपलब्ध झाल्याने बचत गटातील ३५ महिलांना मोमोज बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. रोहा अष्टमी नगरपरिषदच्या ज्येष्ठ नागरिक सभागृहात छोटेखानी कार्यक्रम पार पडला. आपल्या संसारात हातभार लावण्यासाठी महिला आपले छोटे-मोठे व्यवसाय सुरु करतात. अशा कष्टाळू आणि मेहनती महिलांना व्यवसाय करण्यासाठी कुठलीही मदत लागली तर ती मदत करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे आश्वासन नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिले. बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देणे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी बँकेने खारीचा वाटा उचलून बँक कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देणार असल्याचे मत आरडीसी बँकेचे संचालक गणेश मढवी यांनी व्यक्त केले. यावेळी आरडीसी बँकेचे रोहा शाखेचे मॅनेजर राजेंद्र जंगम, सभापती महेश कोलाटकर, नगरसेविका संजना शिंदे, नीता कोलाटकर व दमखाडी येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### समाजसेवा हेच ध्येय : प्रमोद म्हसकर

**खांब** : शासकीय योजनांच्या माध्यमातून अनेकजण समाजोपयोगी कामे करतात; मात्र स्वकष्टाने कमावलेल्या पैशातील काही हिस्सा समाजासाठी खर्च करून गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी मोठे धैर्य आणि सामाजिक बांधिलकी लागते. ज्या समाजात जन्म झाला, त्या समाजाचे आपल्यावर ऋण आहे. त्यामुळे जेवढे शक्य आहे, तेवढे समाजाला देण्याचा कायम प्रयत्न राहील, असे प्रतिपादन प्रमोद म्हसकर यांनी केले. प्रमोद म्हसकर यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि.२९) विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी वाढदिवस साजरा करत असल्याचे म्हसकर यांनी सांगितले. वाढदिवसानिमित्त आयोजित उपक्रमांतर्गत मोफत आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व कार्ड वाटप, ९० किलो बुंदी लाडू तुला सोहळा, ७६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, ४३०० फळझाडांचे वाटप, १०० आदिवासी व ठाकूर समाजातील मुलांना सायकल वाटप, २५०० हून अधिक सभासदांना टी-शर्ट वाटप, मोफत नेत्र तपासणी शिबीर, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मोफत शासकीय दाखले वाटप व मार्गदर्शन तसेच २०० अंगणवाड्यांना खेळणी व साहित्य वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम यावेळी राबविण्यात आले.

### सीपीआर प्रशिक्षण कार्यशाळा

**चिरनेर** : रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर एएससी महाविद्यालय पुणे येथे सी.पी.आर. विषयावरील अतिथी व्याख्यान आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई येथील अपोलो रुग्णालयातील तज्ज्ञांच्या पथकाने महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना सीपीआरचे सैद्धांतिक मार्गदर्शन तसेच प्रत्यक्ष हाताळणीद्वारे प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी केली. यायला अपोलो रुग्णालयातील तज्ज्ञांनी सीपीआरची पाच टप्प्यांमध्ये करण्यात येणारी जीवनरक्षक प्रक्रिया विद्यार्थ्यांना सविस्तरपणे समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सीपीआर तंत्र आत्मसात केले. तज्ज्ञांच्या पथकाने विद्यार्थ्यांना सीपीआर (हृदय-फुफ्फुस पुनर्जीवन) हे जीवनरक्षक तंत्र अवगत असण्याचे महत्त्व आणि आजच्या परिस्थितीत त्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. वैद्यकीय मदत मिळेपर्यंत गरजू व्यक्तीचा जीव वाचविण्यासाठी प्रत्येकाने सीपीआरसारख्या आपत्कालीन जीवनरक्षक तंत्राचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ‘हृदयाच्या प्रत्येक स्पंदनासाठी’ उपक्रमाद्वारे एकूण १ हजार २०९ सहभागी लाभार्थ्यांनी सीपीआरचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व सीपीआर शपथ घेतली.

# पावसामुळे पनवेलच्या रस्त्यांची चाळण



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल शहरात मुसळधार पावसामुळे प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुतर्फा उभी असलेली वाहने आणि खड्डेमय रस्ते यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि लहान मुलांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. महानगरपालिकेकडून खड्ड्यांमध्ये खडी टाकून तात्पुरती डागडुजी करण्याचे काम सुरू आहे. तरी हा उपाय निष्फळ ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे तात्पुरत्या उपायांऐवजी दर्जेदार रस्त्यांची मागणी जोर धरत आहे.

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका मुरूड-जंजिरा पैकी, मुरूड नगरपरिषदेचे हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत शैला अनिल वढावकर यांचे खुद्द मालकीची आहे.

| अनु. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर पॉ.) | आकार (रू.-पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | ५२ | ६/अ | ०-०५-०० | २-५० |
| २ | ५२ | ७/अ | ०-०९-१० | ३-७२ |
| ३ | ५२ | ७ ब | ०-०८-९० | ३-७२ |

वर नमूद जमिन मिळकतींचे सिटी सर्व्हे क्रमांक २४०६ आणि २४०७ असे एकत्रितपणे क्रमांक आहेत आणि सदर मिळकती खारभूमी लाभ क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या व एकमेकांलगत असणाऱ्या मिळकती आहेत. त्यापैकी सर्व्हे नंबर ५२/७/अ या मिळकतीमध्ये शेतघर बांधण्यात आले आहे. मुरूड नगरपरिषदेने दिलेल्या झोन दाखल्यानुसार सिटी सर्व्हे नंबर २४०६ व २४०७ या दोनही मिळकती अंशत: रहिवास विभागातील व अंशत: वाडी विभागातील आहेत.

आमचे अशिलांनी सदर जमिनी व घर मिळकत खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद एकूण मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे मुरूड (मुरूड नगरपरिषद हद्दीतील) येथील सर्व्हे नंबर ५२/६/अ, ५२/७/अ आणि ५२/७/ब या जमिनी व त्यावरील शेतघर या एकूण मिळकतीमध्ये अथवा त्यापैकी काही भागावर वर नमूद मालकाव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशिल ठरविणार असलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील, त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ३१/०७/२०२६

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे. फुफादेवीपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ. सरिता महेंद्र थळे, रा.मु.सारळ, २) श्री. गजानन दामोदर पाटील, ३) श्री. तुळशिदास दामोदर पाटील, ४) श्री. नवनाथ दामोदर पाटील, ५) श्री. प्रतिक भरत पाटील, नं. २ ते ५ रा. मु. फुफादेवीपाडा, पो. सारळ, ६) श्रीमती. शारदा कमळाकर पाटील, रा. पानतवणे, पो. सारळ, ७) श्री. संजय दामोदर पाटील व ८) श्री. सत्यवान दामोदर पाटील, नं. ७ व ८ रा. मु. फुफादेवीपाडा, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड, यांचेकडून आमचे अशिलांनी कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| फुफादेवीपाडा | १६/३/ब | ०-७६-०० | |
| | | पो. ख. ०-०८-०० | ०.९९ |
| | | ०-८४-०० | |

सदर मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध असुन ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १/८/२०२६

सही /-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## MAHAVITARAN — Tender Notice

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below -

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ Transportation/ T-07/2026-27 | Annual Contract for Loading & Unloading, transportation of PSC/RSJ poles of all sizes, steel materials, Distribution Transformers, Sub-Station Equipments, Line Material by suitable vehicles under Goregaon Division of Pen Circle | 20.00 | 20,000/- | 2500+ 18%GST = 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 01.08.2026 to Dt. 14.08.2026. Submission of Bid is up to Dt. 15.08.2026 till 17.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

PRO No. 082

**Executive Engineer, Goregaon Division**

## जाहिर नोटीस

अर्जदाराचे वकील ॲड.

**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात.**

**अर्ज क्रमांक- /२०२६**

श्री. अहमद इसाक नाडकर
व्यवसाय मोलमजुरी — अर्जदार
रा. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

विरुद्ध

१) ग्रामपंचायत जसवली.
ता. श्रीवर्धन, जि. रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, यातील अर्जदार श्री. अरशद अब्दुल गफुर करदमे, रा. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार यांचा स्वता जन्म दाखला दि.०१/०६/१९५४ रोजी, मु. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड झाला असून तिच्या जन्माची नोंदीबाबत दाखला मिळणेकरीता व तशा प्रकारचे निर्देश यातील सामनेवाला यांस मे. कोर्टामार्फत देणेकरीता मे. कोर्टात जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्यये नोंद करुन मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामाकरीता हवा आहे.

सबब या नोटीसीने कळविण्यांत येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व स्वता जन्म दाखला दि. ०१/०६/१९५४ रोजी मु. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा. न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाची तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण:- श्रीवर्धन
दिनांक:- ३०/०७/२०२६

**मा. कार्यकारी दंडाधिकारी**
**ता. श्रीवर्धन, जि. रायगड**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका श्रीवर्धन रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती श्रीवर्धन येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत:-

**मौजे :-सायगाव, ता:- श्रीवर्धन, जि:-रायगड**

| सर्व्हे/गट नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| १८४ | १.जावीद अब्दुल गफूर पठाण<br>२.ताजबेगम लियाकत बडे<br>३. फातीमा नाझीम काजी | ०.४२.६० | ९.०३ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण:- श्रीवर्धन
दिनांक:- ०१/०८/२०२६

सही/-
**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता: शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्यूँबीक्स, प्लॉट नं-८७,
सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४

## ग्रुप ग्रामपंचायत वडखळ ता.पेण, जि.रायगड

**ई-निविदा सन २०२६-२०२७(1 st Call)**

ग्रुप ग्रामपंचायत ता.पेण कडील खालील कामांची योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage rate tender दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. तरी खालील निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | लेखाशिर्ष | टेंडर फी रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | कंत्राटदार वर्गीकरण | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ग्रुप ग्रामपंचायत वडखळ हद्दीतील कचरा गोळा करणेचा ठेका देणे ग्रुप ग्रामपंचायत वडखळ ता.पेण | रु. २७,०६,९१२/- | ग्रामनिधी | रु. ११८०/- | २७०६९/- | - | जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था |

सदर काम ग्रामपंचायत करण्यास तयार असतील तर ग्रामविकास व जलसंधारण विभागा कडील शासन निर्णय संकीर्ण/ २०१०/२७५/प्र.क्र.१७२/प.रा.७मंत्रालय, दिनांक १९ ऑक्टोबर २०११ मधील १(ब)(२)मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीने ई-निविदा कार्यपध्दतीनुसार काम करण्याचे आहे. त्यामुळे अन्य निविदाधारकांनी भरलेल्या निविदा रद्दबातल ठरविण्यांत येतील. याबाबत ई-निविदा पध्दतीने निविदा सादर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा रद्दबातल केल्याबाबत स्पष्टीकरण देण्यास ग्रामपंचायत बांधील राहणार नाही.

**निविदेचे वेळापत्रक**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. ०१/०८/२०२६ पासुन<br>दि. १७/०८/२०२६ पर्यंत | १०.००<br>१७.०० |
| ई-निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. १७/०८/२०२६ पर्यंत | १७.०० |
| ई-निविदा उघडणेची वेळ व तारीख | दि. १९/०८/२०२६ | ११.०० |
| ई-निविदा उघडणेची प्राधिकृत केलेले अधिकारी | १ सरपंच /ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वडखळ | |

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-साळोख तर्फे निड आदिवासीवाडी, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकती त्या मिळकतीचे मालक श्री.गणेश बाळू चव्हाण, यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १९ | ३ | ०.५६.८०<br>पैकी लिहून देणार यांच्या मालकिची ०.१६.८० | ८.१५ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमिन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०१/०८/२०२६

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो.नं.९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

अर्जदार तर्फे वकिल
ॲड. राजीव नथुराम शेरमकर
निशाणी क्रमांक :- ०८/ड

## जाहिर नोटीस

**अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. याचे कोर्टात.**

दिवाणी चौ.अर्ज नं.०२/२०२६

१) श्रीमती. अनुराधा गंगाधर मालपेकर,
वय- ७८ वर्षे, धंदा -गृहिणी,
रा. मु. मांडवा, पो. धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड.
२) श्री. गिरिष गंगाधर मालपेकर,
वय- ५४ वर्षे, धंदा - नोकरी,
रा. मु. मांडवा, पो. धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड.
३) सौ. प्रिती प्रशांत राजपुरकर, (नेत्राली गंगाधर मालपेकर)
वय- ४३ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. मराठे हॉस्पी. निजामपुर रोड, उतेखोल, माणगाव, — अर्जदार
ता. माणगाव, जि. रायगड. ४०२१०४.
४) श्रीमती.सुजाता बालकृष्ण भुर्के, (भारती तुकाराम मालपेकर)
वय- ८० वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. १०२, कावेरी नं. १, चिंचोली बंदर रोड, राम नगर,
मालाड-वेस्ट, मुंबई- ४०००६४.
५) श्रीमती. अनुराधा अशोक शेटे, (पुष्पा तुकाराम मालपेकर)
वय - ७३ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. घर नं.६४५, चव्हाण वाडा, विमला तलावा जवळ,
कामठा, उरण, ता. उरण, जि. रायगड. ४००७०२.

विरूद्ध,

कोणीही नाही — सामनेवाला

१) अर्जदार नं. १ चे सासरे, अर्जदार नं. २, ३ यांचे आजोबा व अर्जदार नं. ४,५ यांचे वडिल कै. तुकाराम कृष्णा मालपेकर हे मयत झालेले आहेत. त्यांचे पश्चात त्यांना पुढील प्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

कै. तुकाराम कृष्णा मालपेकर (मयत)
↓
मनोरमा (पत्नी मयत) | गंगाधर (मयत) | रमाकांत (अविवाहित मयत) | भारती (मुलगी) | पुष्पा (मुलगी)
गंगाधर (मयत) ↓
अनुराधा | गिरिष | प्रिती

२) कै. तुकाराम कृष्णा मालपेकर हे मयत झाल्यानंतर त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. कै. तुकाराम कृष्णा मालपेकर यांची पत्नी कै.मनोरमा तुकाराम मालपेकर या मयत आहेत. त्याच प्रमाणे मुलगा कै. रमाकांत तुकाराम मालपेकर हे दिनांक १५/०८/१९९८ रोजी अविवाहित मयत झालेले आहेत. त्यांस अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांज व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. कै. तुकाराम कृष्णा मालपेकर व कै. मनोरमा तुकाराम मालपेकर यांचा मुलगा कै. गंगाधर तुकाराम मालपेकर हे दिनांक २४/१२/१९९१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांस अर्जदार क्र. १) श्रीमती. अनुराधा गंगाधर मालपेकर,२) श्री. गिरिष गंगाधर मालपेकर, ३) सौ. प्रिती प्रशांत राजपुरकर,(नेत्राली गंगाधर मालपेकर) हेच कायदेशिर वारस आहेत. कै. रमाकांत तुकाराम मालपेकर यांस अर्जदार क्र. १ ते ५ व कै. गंगाधर तुकाराम मालपेकर यांस अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारसदार असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदार सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

३) कै. रमाकांत तुकाराम मालपेकर व कै. गंगाधर तुकाराम मालपेकर हे मयत असल्यामुळे अर्जदार हे उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय अलिबाग यांचे ऑफिसमध्ये वारस नोंद करणे करिता गेले असता कै. रमाकांत तुकाराम मालपेकर व कै. गंगाधर तुकाराम मालपेकर यांचा वारस दाखला सादर करणे बाबत तोंडी अर्जदार यांस सांगितले आहे. त्यामुळे वारस दाखला मिळण्या करिता अर्जदार यांनी दिवाणी चौ. अर्ज क्र.-०२/२०२६ मे कोर्टात दाखल केलेला आहे.

अर्जदार यांनी सदर वारस दाखला मिळण्या करिता अर्ज दिलेला आहे. सदर वारस दाखल्या बद्दल कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी तशी लेखी हरकत ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत किंवा दिनांक- ३१/०८/२०२६ रोजी पर्यंत या मा. न्यायालयामध्ये हजर होवून दाखल करावी.

वरिल मुदतीमध्ये कोणीही हरकत अगर तक्रार मे कोर्टात दाखल न केल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांस वर नमुद तारखेस कै. रमाकांत तुकाराम मालपेकर व कै. गंगाधर तुकाराम मालपेकर यांचे अर्जदार हे कायदेशिर वारस असलेबाबतचा वारस दाखला देणे बाबत आदेश पारित करिल.

सदरची नोटीस आज दिनांक- ३० माहे ७ सन २०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग - रायगड.**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग - रायगड.**

## शुद्धीपत्रक

दि. ३१ जुलै २०२६ रोजी कृषीवल वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या ॲड.विजय वि.पाटील यांच्या जाहीर नोटीसीमध्ये नजर चुकीने प्रतिवादींची नावे शशिकांत शंकर महारलकर आणि सुनिल शंकर महारलकर अशी छापण्यात आली आहेत. तरी ती शशिकांत शंकर महालकर आणि सुनिल शंकर महालकर अशी वाचण्यात यावी ही विनंती चुकी बद्दल क्षमस्व.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| दामोदर नारायण पाटील | ३२९ | - | ०-५२.३०<br>पैकी ०-२०.०० | ६.५० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील दामोदर नारायण पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १८/०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ मालक श्री. रविंद्र अनंत झेले, रा. पाटणेश्वर प्रसाद बिल्डींग, झिराळ आळी, पेण ता. पेण, जि. रायगड, सौ. हेमलता विकास काळे, सौ. मनस्वी महेश महाडीक, श्रीमती वनिता राजेंद्र झेले, श्री. नारायण राजेंद्र झेले, सौ. प्रार्थी सागर पाटील, सौ. वैभवी भास्कर गायकर, श्रीमती लिला अनंत झेले यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| घावटे | ५/१ | ०-१४-४० | ०-००-८० | ४.१२ |

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे-येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील वहीवाटीतील, निर्वेध बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. ३१/०८/२०२६

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा.ईशान्य को.ऑप.हौ.सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं.१०३.
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८६८७३६९३६९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.देवेंद्र शरद नाईक यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतीवरील त्यांचा मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असत्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| भूमापन आणि उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ९५/४ | ०२-५२-९० | ०४.०६ |

पैकी ०१-२६-९० हे.आर.चौ.मी. आकार ०२.२९ रू.पै. इतके क्षेत्र.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वास कळावे.

दिनांक :- ०१/०८/२०२६

**ॲड.तन्मय रविंद्र ओक**
'गुरूकृपा'', अलिबाग अर्बन
बँकेशेजारी, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.गुणवंत धर्मराज झोपे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक सौ.साधना अशोक मोळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. देवपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७ | ३/ब/१ | ०-७०-०० | ०-५० |

**यापैकी सौ. साधना अशोक मोळे यांचे मालकीची व हिश्याची ०-३५-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत देणेचे ठरले आहे.**

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०१/०८/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड -४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये नर्स पाहिजे. (ANM, GNM) मो.८७८८७३१६०८
- कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅली व संगणक ज्ञान आवश्यक मोबाईल नं. ९८५०२९५७५५/८७९६८५५५५५
- O' NEST Group of Hotels येथे हाऊसकिपर, वेटर? रेस्टॉरन्ट मॅनेजर तसेच गार्डन व किचन कामासाठी १ जोडपे तातडीने हवे. ठिकाण अलिबाग/रत्नागिरी संपर्क- ९९७५५१६१२३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : महिन्याचा प्रारंभ उत्साहात होईल. नव्या योजनांना चालना मिळेल. घरगुती व्यवसायात प्रगती होईल.
- **वृषभ** : विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक आवक मनाजोगी राहील.
- **मिथुन** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : आर्थिक घडामोडी मनाजोग्या होतील. कामाला नवी दिशा मिळेल. कर्ज प्रकरणांना चालना मिळेल.
- **सिंह** : कोणत्याही गोष्टीची अधिक चिंता करू नका. अपेक्षित लाभाची प्रतिक्षा करा. मुलांची प्रगती होईल.
- **कन्या** : प्रवास शक्यतो टाळावा. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. कोणावर अतिविश्वास टाकू नका.
- **तूळ** : कामाचा आवाका लक्षात घ्या. नसत्या जबाबदाऱ्या टाळायला हव्यात. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **वृश्चिक** : मनात योजलेले प्रत्यक्षात घडेल. वाहनांचा वापर व्यवस्थित करा. बोलताना पुरेसा विचार करावा.
- **धनु** : कलाकारांचा उत्साह वाढेल. उत्पन्नाचे नवे स्त्रोत लक्षात घ्यावे. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल.
- **मकर** : परिश्रमाचं योग्य सार्थक होईल. समस्या वाढल्या तरी चिंता करू नये. योग्य मार्ग सापडत जाईल.
- **कुंभ** : नसत्या आश्वासनात अडकू नका. विवहातील अडचणी दूर होतील. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभेल.
- **मीन** : सरकारी कामांबाबत समाधान लाभेल. महत्त्वाचे निर्णय दूरदृष्टीने घ्यावेत. प्रगतीला बरा वाव मिळेल.

## दिन विशेष

### १ ऑगस्ट

**२०१३ :** महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी राज्य सरकारने दोन हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली.
**२०१४ :** प्रसिद्ध चित्रपट निर्माते मुजफ्फर अली यांना राजीव गांधी राष्ट्रीय सदभावना पुरस्कार जाहीर.
**२०१७ :** 'लष्कर ए तैय्यबा'चा म्होरक्या अबू दुजाना चकमकीत ठार.
**२०१८ :** अ‍ॅट्रॉसिटी कायदा 'जैसे थे' राखणाऱ्या महत्त्वाच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

## आरोग्यमंत्र

### ये लाल रंग...

आहारात विविध घटकांचा समावेश असला तरी उपयुक्त खाद्यघटकांचं प्रमाण जास्त असणं गरजेचं असतं. या दृष्टीने आहारात गडद रंगाच्या अन्नघटकांचं प्रमाण अधिक ठेवावं कारण त्यात पोषक घटकांचं प्रमाण जास्त असतं. आपण लाल रंगाच्या भाज्या आणि फळांच्या लाभांविषयी जाणून घेऊ या...



* लाल फळांमध्ये अँथोसियानिस नावाचं अँटिऑक्सिडंट असतं. यात शरीराचा दाह कमी करणारे घटक असतात. यामुळे रक्तवाहिन्या आणि सांध्यांचं आरोग्य टिकून राहतं. लाल फळांमध्ये लायकोपेन हा घटक असतो. लायकोपेन हे अँटिऑक्सिडंट असून ते कॅन्सरविरोधी मानलं जातं. लायकोपेनमुळे पदार्थाला नैसर्गिक लाल रंग प्राप्त होतो. * लाल फळांमध्ये पोटॅशियमचं प्रमाण जास्त असतं. यामुळे हृदयाचं आरोग्य टिकून राहतं. रक्तदाब नियंत्रणात राहतो. * लाल पदार्थांमध्ये 'अ' आणि 'क' ही जीवनसत्त्व असतात. यामुळे कॅन्सर, आर्थ्रायटिस आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. त्वचा, केस आणि नखं यांचं आरोग्य राखण्याचं काम ही जीवनसत्त्व करतात. लाल फळांमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. * शरीराचं कार्य सुरळीत सुरू ठेवण्यासाठी पेशींना इलेक्ट्रॉलाईट्स या घटकाची आवश्यकता असते. ती लाल फळांच्या सेवनातून पूर्ण होते. लाल फळांमध्ये पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियम या घटकांचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो.

## टेक फन

### झुरळ नव्हे... रोबो

अमेरिकन शास्त्रज्ञांनी झुरळाच्या आकाराचा रोबो तयार केला आहे. हा रोबो इतका बळकट आहे की माणसाचा पाय पडल्यावरही तो तुटणार नाही. नैसर्गिक आपत्तींमध्ये मदतकार्यासाठी या छोट्याशा रोबोचा वापर करता येईल, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. काही दुर्गम प्रदेशांमध्ये माणूस,जनावरं आणि उपकरणं पोहचू शकत नाहीत. अशा ठिकाणी हा रोबो पोहचू शकेल. याबाबतची चाचणीही शास्त्रज्ञांनी घेतली आहे. या रोबोवर माणसएवढं वजन ठेवण्यात आलं. पण रोबो तुटला नाही किंवा त्यात कोणताही बिघाड झाला नाही. भूकंपानंतर उपकरणं किंवा कुत्र्यांच्या मदतीने ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांचा शोध घेताना बऱ्याच अडचणी येतात. म्हणूनच असे छोट्या आकाराचे रोबो तयार केले जातात. हे रोबो ढिगाऱ्याखालच्या माणसांचा शोध घेऊ शकतात. यामुळे अनेकांचा वाचवता येऊ शकतं. या रोबोचं वजन खूपच कमी आहे. मात्र तो ६० किलो वजन अगदी सहज उचलू शकतो. या रोबोमध्ये बॅटरी बसवण्यात येणार आहे. यामुळे तो स्वतंत्रपणे काम करू शकेल. तसंच गॅस सेन्सर्सही बसवण्यात येणार आहेत.

## ब्युटी टॉक

### असा मिळवा मॅट लूक

लिपस्टिकमुळे चेहऱ्याचं सौंदर्य खुलतं. सध्या बऱ्याचजणी मॅट लिपस्टिक वापरतात. मॅट लिपस्टिक बराच काळ टिकून रहाते. या लिपस्टिक ग्लॉसी लिपस्टिकच्या तुलनेत थोड्या महाग असतात. तुमच्याकडे ग्लॉसी लिपस्टिक्स असतील तर त्यांना मॅट लूक देता येईल. काही ट्रिक्सनी तुम्ही मॅट लूक मिळवू शकता.

* ओठांवर ग्लॉसी लिपस्टिक लावा. टिश्यू पेपर घ्या. त्यावर थोडी ट्रांस्लुसेंट पावडर घाला. आता ही पावडर हलक्या हातांनी ओठांवर लावा. ट्रांस्लुसेंट पावडरमुळे तुमच्या ग्लॉसी लिपस्टिकला मॅट लूक मिळेल आणि ती बराच काळ टिकून राहिल. * ग्लॉसी लिपस्टिक लावल्यानंतर एक टिश्यू पेपर घ्या. हलक्या हातांनी ओठांवर फिरवा. ग्लॉसी लिपस्टिकची चमक टिश्यू पेपरमुळे शोषली जाईल आणि तुम्हाला मॅट लूक मिळेल. * मॅट लूक मिळवण्याची आणखी एक पद्धत म्हणजे ग्लॉसी लिपस्टिक लावल्यानंतर थोडी ट्रांस्लुसेंट पावडर बोटांवर घेऊन हलक्या हातांनी ओठांवर लावा. टिश्यूने जास्तीची पावडर काढून टाका. पावडरमुळे ग्लॉसी लिप कलर शोषला जाईल आणि ओठांना मॅट लूक मिळेल.

## पंचांग

**शनिवार, १ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ कृ. ३, चंद्रराशी : कुंभ, नक्षत्र : शततारका, योग : शोभन, सूर्योदय ६.१८, सूर्यास्त ७.१२

## फॉरवर्ड्स

**अपना अंदाज़ औरों से ज़ुदा ऱखते हैं...**

**लोग़ मंदिरों-मस्ज़िदों में जातें हैं...**
**हम अपनें दिल में ख़ुदा ऱखते हैं...!**

## वेगळ्या वाटा

यासोबतच विद्यापीठ अनुदान आयोगास इतर काही सरकारी विभाग, खाजगी संस्थांकडून पीएचडीसाठी शिष्यवृत्ती मिळू शकते. बीटेक आणि एमटेक केल्यानंतर बहुसंख्य विद्यार्थी चांगल्या कंपनीत नोकरी बघतात. रिसर्च आणि डेव्हलपमेंट, मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी कंपन्यांसह विविध कंपन्यांमध्ये रिसर्च असोसिएट, सीनियर इंजिनिअर, प्रोजेक्ट मॅनेजरसारख्या पदांवर काम करता येईल. देशात चांगल्या प्राध्यापकांची गरज लक्षात घेता तुम्ही या क्षेत्रातही जाऊ शकता. याशिवाय स्वत:ची कंपनी सुरू करण्याचा विचारही करता येईल. सध्या स्टार्ट अप्सनाही चांगली मागणी आहे.

## करिअरवाटा

### मोलाचे प्रशिक्षण

मोटिव्हेशन इंडस्ट्री अर्थात कामगारांना कामास प्रेरित करण्याचं शिवधनुष्य पेलणारं क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. या माध्यमातून कार्यप्रेरित झालेले कामगार थोड्या कष्टात अधिक काम करू शकतात. म्हणजे मोटिव्हेशन या एका अमूर्त गोष्टीतून लाखो रुपयांचा मूर्त फायदा होतो. म्हणूनच हजारो रुपये खर्च करून काही कंपन्यांवर कामगारांना ताजंतवानं करण्याची जबाबदारी सोपवली जाते. ती पार पाडणाऱ्या अनेक कंपन्या उदयाला येत आहेत. चांगला पैसा मिळवत आहेत. मोठ्या कंपन्यांमधल्या कामगारांना आणि अधिकाऱ्यांना वर्तनशास्त्राच्या आधारे काही जीवन कौशल्यं शिकवणं गरजेचं ठरतं. त्या दृष्टीने कामगारांच्या विशेष प्रशिक्षणावर भर दिला जातो. अशा प्रशिक्षणाद्वारे हजारो कामगारांना योग्य प्रशिक्षण दिलं जाऊ शकतं. ही पद्धत रुढ होत असल्यामुळे या व्यवसायाचा व्याप वाढत जातो आणि त्याबरोबर व्यवसायाची उलाढालही वाढत आहे. मात्र या व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. त्याचबरोबर उत्तम संवाद कौशल्य असेल आणि इतरांना कार्यासाठी प्रेरित करण्याची आवड असेल तर या व्यवसायाचा अवश्य विचार करावा.



## खेचाखेची

### शोध

टीचर बीएलओ बनून मुलांच्या आई-वडिलांना शोधत आहेत.

आई-वडील २००२ च्या लिस्टमध्ये आपल्या आई-वडिलांना शोधत आहेत.

## वेगळं काही

जगातल्या सर्वात महागड्या बटाटा वेफर्सच्या पाकिटाची किंमत ५६ डॉलर्स आहे. गंमत म्हणजे या पाकिटात फक्त पाच वेफर्स असतात. त्यानुसार एका वेफरची किंमत ११ डॉलर्स होते. स्वीडनमधल्या सेंट एरिक्स ब्रुवरी नामक कंपनी हे वेफर्स तयार करते. छोट्याशा पेटीत हे पाच वेफर्स असतात. या पेटीत एखादा दागिना किंवा मौल्यवान वस्तू आहे की काय, असंच वाटतं. हे वेफर्स वेगवेगळ्या पाच चवींमध्ये उपलब्ध आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार ते तयार केले जातात. या वेफर्सच्या डब्यात कंपनीचं प्रमाणपत्रही असतं. बनावट वेफर्सना आळा बसावा यासाठी कंपनी प्रमाणपत्र देते. यासोबतच हे वेफर्स तयार करण्यासाठी महागड्या घटकांचा वापर केला जातो.

## सौंदर्यसाधना

### चांगला मेक अप

मेक अपचं तंत्र अवगत केल्यास छोट्या-मोठ्या प्रसंगी तयार होणं अगदी सोपं होतं. अर्थात त्यासाठी महागड्या क्लासमध्ये नावनोंदणी करायला हवी असं काही नाही. काही टिप्सचा अवलंब केला तरी मेक अप जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने करणं सहजशक्य आहे. याविषयी...



* घरातून बाहेर पडताना लावलेलं काजळ काही वेळातच निघून जातं. मग चेहऱ्यावर त्याचे काळे डाग दिसतात. अशा वेळी काजळ जेलसारखं रहावं या हेतूने हेअर ड्रायरने कमीत कमी तापमानावर गरम करावं आणि नंतर लावावं. यामुळे ते ओघळण्याचा धोका रहात नाही. * बरेचदा लिप लायनर आणि आय लायनर सुकतात. अशा वेळी ड्रायरच्या लो हिट सेटिंगवर एअरने ब्लो करावं. * घरातून निघताना लावलेली लिपस्टिक काही वेळातच गायब झालेली दिसते. रंगाचा बेरंग होतो. हे टाळण्यासाठी, लिपस्टिक ओठांवर जास्त काळ रहावी यासाठी फाऊंडेशन किंवा प्रायमरचा वापर करणं योग्य ठरतं. फाऊंडेशन ओठांवर लावावं आणि काही वेळाने पुसून टाकावं. त्यानंतर लिपस्टिक लावावी.

## सुडोकू १३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | २ | | ४ | | ९ | | ६ |
| ९ | | | | | २ | | १ | |
| ४ | ८ | १ | | | ७ | २ | | ३ |
| | | | | | ९ | | ४ | |
| | १ | | ३ | | ६ | | ८ | |
| | ६ | | | ८ | | | | |
| ८ | | ३ | ४ | | | १ | ६ | २ |
| | ४ | | १ | | | | | ७ |
| १ | | ७ | | ९ | | ५ | | ४ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १ | ५ | ६ | ७ | ३ | २ | ९ | ४ |
| ४ | ७ | ९ | ८ | ५ | २ | ३ | १ | ६ |
| २ | ३ | ६ | ४ | १ | ९ | ५ | ८ | ७ |
| ७ | ९ | २ | ५ | ३ | ८ | ६ | ४ | १ |
| १ | ५ | ४ | २ | ९ | ६ | ८ | ७ | ३ |
| ३ | ६ | ८ | १ | ४ | ७ | ९ | ५ | २ |
| ९ | ८ | ३ | ७ | ६ | १ | ४ | २ | ५ |
| ६ | ४ | ७ | ९ | २ | ५ | १ | ३ | ८ |
| ५ | २ | १ | ३ | ८ | ४ | ७ | ६ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १३४



**आडवे शब्द :-**
१) असंभवनीय असा मोठा लाभ
५) सं ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
९) आगबोट
११) आमरसाची पोळी
१२) तृण
१४) हिंदीत दु:ख
१५) धुणे
१७) एक भटकी जमात
१९) क्षुल्लक, नीच, तेजोहीन
२२) सिंह
२३) जुगाराचा एक प्रकार
२४) लोकसभा
२५) सळई, काडी, खुंटी
२६) फसव्या, धूर्त मनुष्य
२७) कुंभाराची भट्टी
२८) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
३०) रथ हाकणारा
३१) एखाद्याच्या वतीने घातलेली भीड
३४) पौराणिक अश्ववाहन
३५) सबब
३७) प्रथम पुजेचा मान असलेला देव
३८) ओलसर हवा
४१) निवासस्थान
४२) पाठविलेला
४४) नजरेचा तीर
४६) अनाथच्या विरुद्ध
४७) तोंडातोंडी झालेला व्यवहार
५२) देवापाशी मागितलेला निर्णय
५३) टरफल
५४) शृंगारिक लावण्या म्हणणारा
५६) धमनी
५७) ज्वारी/बाजरीचा एक पदार्थ
५८) नकला करणारा
६०) पळून जाणे
६२) एक सुगंधी वनस्पती
६४) गव्हाचे जाडसर पीठ
६५) जास्तीत जास्त
६७) पालव
७१) सहस्त्र
७२) मानवी कत्तल
७४) तोंडी वचन किंवा करार
७५) दरोडा
७६) ज्ञाति
७७) युवती

**उभे शब्द :-**
१) अशा प्रकारचा
२) भीतीने थरथर कापणे
३) संसर्ग, पिशाचबाधा
४) संसार, जन्म, उत्पत्ती
६) रत्नाकर
७) कालपुरुष
८) ताठा, गर्व
९) जन्म-मृत्यू
१०) प्रत्येक जन्मांत
१३) शोध, माग
१६) बारीक, मऊ केस
१८) केशवृद्धिची सुगंधी वनस्पती
२०) सहाय्य
२१) शोक, दु:ख
२३) संन्यासी, बैरागी यांचे राहण्याचे ठिकाण
२४) संभाषण
२५) आण, भाक, वचन
२७) पत, अब्रू, नाव
२९) पोत्याचे कापड
३०) उंट हाकणारा
३२) श्रीरामाचे जनकजननी
३३) उंट, हत्ती यांची विष्ठा
३६) मोठा , महान
३७) हरविलेले सापडणे
३९) वर्षाचा बारावा महिना
४०) आई
४१) मोठा जाड हातोडा
४३) होडी
४५) घोडेस्वार
४८) प्रकाशणे, लकलकणे
४९) व्रत
५०) हालचाल
५१) उत्तेजन, आश्वासन
५४) विद्या
५५) चकाकी, तजेला, तेज
५६) मुस्लीम सरदार
५७) हमाल
५९) मणका
६१) हात
६२) एक श्वासरोग
६३) न्याय
६५) कडक, पांढुरका रंग
६६) एक ऋतू
६७) पुन्हा
६८) सुंदर युवती, स्त्री
६९) एक चतुर्थांश भाग
७०) झकास
७२) काढलेली सुट्टी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त



# 'किंग'चे चित्रीकरण अंतिम टप्प्यात

**बॉ**लिवूडचा बादशाह शाहरुख खान पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर जबरदस्त ॲक्शन आणि भावनांचा संगम घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहे. बहुचर्चित 'किंग' चित्रपटाचे अंतिम आंतरराष्ट्रीय चित्रीकरण अमेरिकेत होणार असून, त्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांच्या भव्य मांडणीमुळे या चित्रपटाबाबतची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. जॉर्जियामधील महत्त्वाचे चित्रीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर आता केवळ दमदार क्लायमॅक्स ॲक्शन सीक्वेन्स चित्रित होणे बाकी आहे.

विशेष म्हणजे, या चित्रपटात शाहरुख खानसोबत त्याची मुलगी सुहाना खानही प्रमुख भूमिकेत झळकणार असल्याने बाप-लेकीची ही जोडी प्रथमच मोठ्या पडद्यावर पाहण्याची संधी चाहत्यांना मिळणार आहे. ॲक्शन, स्टाईल, भावनिक नातेसंबंध आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे चित्रण यांचा संगम असलेला 'किंग' हा चित्रपट तरुणाईसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. मनोरंजनविश्वातील या बहुप्रतीक्षित सिनेमाविषयीच्या प्रत्येक नव्या घडामोडीकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# अथांग समुद्र आणि प्रियांकाचा जलवा!



**बॉ**लिवूडची 'देसी गर्ल' प्रियांका चोप्राच्या वाढदिवसाचे कौतुक यंदा काही भलतेच खास ठरले! पती निक जोनासने इंस्टाग्रामवर शेअर केलेला स्पेनमधील यॉटवरील एका मखमली सुट्टीचा व्हिडीओ सध्या इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहे. समुद्राच्या लाटा आणि प्रियांकाचा तो दिलखेच अंदाज रसिकांना पार वेड लावत आहे!

२०१६ मध्ये सुरू झालेली ही गोड प्रेमकथा आज किती बहरली आहे, याचीच साक्ष निकच्या या खास पोस्टने दिली. पण खरी मेजवानी तर पुढेच आहे! वाढदिवसाच्या याच खास मुहूर्तावर प्रियांकाच्या आगामी बहुचर्चित 'वाराणसी' चित्रपटातील तिचा पहिला लूक रिलीज करण्यात आला आहे. प्रियांकाचा हा ग्लॅमरस अंदाज आणि वाराणसी चित्रपटातील तिचा थरारक लूक तरुणाईमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करत आहे.

# आता प्रतीक्षा गोलमाल-५ ची!

**रो**हित शेट्टी यांचा 'गोलमाल' फ्रँचायझी म्हणजे मनोरंजनाचा महाकुंभ! आता या धमाल मालिकेचा पाचवा भाग 'गोलमाल ५' मोठ्या स्टारकास्टसह पुन्हा एकदा प्रेक्षकांना पोट धरून हसवण्यासाठी येत आहे. पण या वेळी ट्विस्ट मोठा आहे! अजय देवगण आणि अक्षयकुमार यांच्या जोडीला टक्कर देण्यासाठी दक्षिणेतील लोकप्रिय अभिनेत्री प्रियामणी हिची वर्णी लागली आहे. सर्वात धक्कादायक आणि रंजक बाब म्हणजे, ती या चित्रपटात एका दमदार नकारात्मक भूमिकेत दिसणार आहे.

रोहित शेट्टीच्या विनोदी जगात प्रियामणीची ही खलनायकी एन्ट्री कथानकात नवा थरार निर्माण करणार आहे. 'मैदान' आणि 'चेन्नई एक्स्प्रेस'नंतर अजय देवगण आणि रोहित शेट्टीसोबत तिची ही तिसरी मोठी खेळी असणार आहे. प्रेक्षकांना हसवणाऱ्या 'गोलम ाल'मध्ये आता ही खलनायकी अदा प्रेक्षकांना कशी वाटते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.




# कतरिना-विकीचा कौटुंबिक सोहळा!

**क**तरिना कैफच्या आयुष्यातील हा वाढदिवस अत्यंत अविस्मरणीय ठरला! मुलगा 'विहान'च्या आगमनानंतरचा कतरिनाचा हा पहिलाच वाढदिवस असल्याने, तिने पती विकी कौशल आणि लाडक्या विहानसोबतचा एक कौटुंबिक आणि भावूक क्षण सोशल मीडियावर चाहत्यांशी शेअर केला.

पीच रंगाच्या साध्या कपड्यांमध्ये, मोकळ्या केसांमध्ये कतरिनाचे सौंदर्य कमालीचे खुलून दिसत होते. 'देवाचे खूप आभार, ज्याने मला तुझ्यासारखा अनमोल साथीदार दिला', अशी एक भावनिक टीप लिहून तिने विकीबद्दलचे प्रेम व्यक्त केले. सेलिब्रेशननंतरचा या दोघांचा कॅज्युअल लूक तर चाहत्यांच्या भलताच पसंतीस उतरला आहे. या फोटोमध्ये कौटुंबिक प्रेम आणि कमालीचा साधेपणा स्पष्टपणे झळकत आहे.





# 'थ्री इडियट्स'च्या चाहत्यांसाठी नवी आशा

**'आ**ल इज वेल' म्हणत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा 'थ्री इडियट्स' पुन्हा चित्रपटगृहात येणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र अभिनेता आमिर खानने नुकतेच उघड केले की दिग्दर्शक राजकुमार हिरानी सध्या 'थ्री इडियट्स'च्या सीक्वेलवर काम करत आहेत.

कथानक स्वतःला आवडल्याचे सांगत आमिरने पटकथेवर अंतिम काम सुरू असल्याचेही स्पष्ट केले आहे. म्हणजेच, रणछोडदास, फरहान आणि राजू यांची मैत्री पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर नव्या रूपात अनुभवण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. पुनर्प्रदर्शन नसले तरी नव्या भागाच्या प्रतीक्षेने चाहत्यांच्या उत्साहाला नवी पालवी फुटली आहे. आता सर्वांच्या नजरा या बहुप्रतीक्षित सीक्वेलच्या अधिकृत घोषणेकडे लागल्या आहेत.



# आदित्यचा रोमँटिक ॲक्शन धमाका



**बॉ**लिवूडचा देखणा अभिनेता आदित्य रॉय कपूर आता एका नव्या संगीतमय प्रेमकथेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. टी-सीरिजचे निर्माते भूषण कुमार आणि दिग्दर्शक मिलाप मिलन झवेरी प्रथमच एकत्र येत हा महत्त्वाकांक्षी चित्रपट साकारत आहेत. या चित्रपटात उत्कट प्रेमकथा, हाय-व्होल्टेज ॲक्शन आणि मनाला भिडणाऱ्या संगीताचा सुरेख मिलाफ अनुभवायला मिळणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण लवकरच सुरू होणार असून, आदित्यच्या भूमिकेबद्दल बोलताना मिलाप झवेरी यांनी त्याच्या भावनिक अभिनयाचे विशेष कौतुक केले आहे. त्यांच्या मते, या चित्रपटातील व्यक्तिरेखा प्रेम, संघर्ष आणि भावनिक गुंतागुंत यांचा अनोखा प्रवास दाखवणार आहे. मुख्य अभिनेत्री आणि संगीतकारांच्या नावांची घोषणा लवकरच होणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. आदित्यचे चाहते या नव्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# 'पांडुरंगा अनंता'चे अनावरण

**आ**षाढी एकादशीचे औचित्य साधून 'पांडुरंगा अनंता' हे नवीन गाणे नुकतेच लोकांच्या भेटीस आले आहे. या गाण्याचे शब्द, चाल, संगीत संयोजन आणि संगीत निर्मिती हार्मोनियम वादक आणि संगीतकार मिलिंद वासुदेव यांची आहे. लोकप्रिय गायक श्री राहुल देशपांडे यांच्या सुरेल आवाजात हे गाणे नटले आहे. या गाण्याचे संगीत संयोजन तीन प्रकारच्या शैलींमध्ये करण्यात आले आहे. तबला, पखवाज, टाळ या महाराष्ट्रीयन पारंपारिक, तसेच मृदंगम, घटम अशा साऊथ इंडियन आणि वेस्टर्न शैलींमध्ये हे गाणे आपल्याला ऐकायला मिळते. यामुळे तरुणाईपासून ते ज्येष्ठ वयाच्या लोकांनासुद्धा या गाण्याचा आस्वाद घेता येतो.

एकंदरीतच हे गाणे अतिशय भावस्पर्शी झाले असून ते लोकांच्या पसंतीस उतरत आहे.या गाण्याची निर्मिती 'मिवा युनिव्हर्सल स्टुडिओची' असून 'मिलिंद वासुदेव ऑफिशियल' या यूट्यूब चॅनलवर हे गाणे प्रदर्शित झाले आहे. तसेच पल म्युझिक, स्पॉटिफाय, मेझॉन म्युझिक, गाना, जिओ सावन आणि यूट्यूब या सर्व ऑडिओ प्लॅटफॉर्म्सवर गाणे उपलब्ध आहे.




# मंदाकिनीच्या रूपात प्रियांकाची जादू

**भा**रतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असलेल्या एस. एस. राजामौली यांच्या 'वाराणसी' या भव्य चित्रपटाने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. प्रियांका चोप्राच्या वाढदिवसानिमित्त प्रदर्शित झालेला तिचा 'मंदाकिनी' लूक सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घालत आहे. चार दिवस उलटूनही चाहत्यांकडून या पोस्टवर कौतुकाचा वर्षाव सुरूच आहे. चित्रपटाच्या टीमने 'अँड हिअर शी इज... आवर मंदाकिनी' या ओळींसह तिचा लूक सादर करताच चाहत्यांमध्ये नव्या चर्चांना उधाण आले. हॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केल्यानंतर प्रियांका पुन्हा एका दमदार भारतीय चित्रपटातून मुख्य भूमिकेत दिसणार असल्याने तिच्या चाहत्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे.

महेशबाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांची साथ, राजामौलींचे भव्य दिग्दर्शन आणि प्रियांकाचा रहस्यमय अवतार यामुळे 'वाराणसी' हा वर्षातील सर्वाधिक प्रतीक्षित चित्रपट ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. पडद्यावर उलगडणाऱ्या या अद्भुत सिनेमाई प्रवासासाठी सज्ज व्हा!





# बालांगण

## वैविध्यपूर्ण बुद्धिबळपट

नॉलेज

दोस्तांनो, बुद्धिबळ खेळताना आपल्या मेंदूचा कस लागतो. या खेळातली प्रत्येक चाल हुशारीने खेळावी लागते. भारतानेच जगाला बुद्धिबळाची देणगी दिली. विश्वनाथन आनंदने ग्रँडमास्टर म्हणून नाव कमावलं. तुम्हालाही बुद्धिबळ येत असेल, तुमच्याकडेही बुद्धिबळाचा पट असेल. पण जगभरात वैशिष्ट्यपूर्ण बुद्धिबळाचे पट पहायला मिळतात. अशाच काही आखीव रेखीव आणि सुंदर बुद्धिबळपटांवर नजर टाकू या.

✻ बुद्धिबळपट सोन्या-चांदीचेही असतात. या पटांचा वापर खेळण्यासाठी नाही तर सजावटीसाठी केला जातो.

✻ जर्मनीमध्ये बीच वूडपासून अनोखा बुद्धिबळपट बनवण्यात आला आहे. सर्वसामान्य बुद्धिबळपटांच्या तुलनेत हा पट थोडा छोटा आहे. पण तो खूपच आकर्षक आहे.

✻ 'अ‍ॅप्रोच द बेंच' नावाचा एक बुद्धिबळपट आहे. वकिलांना समोर ठेऊन हा पट बनवण्यात आला आहे. या पटाच्या सोंगट्या पितळेच्या आहेत. तसंच या पटावरचे चौकोन काळेपांढरे नाहीत तर कोर्टरूमप्रमाणे चॉकलेटी लालसर रंगाचे आहेत.



✻ रोमन ग्लॅडिएटर्स थ्रीडी हा अनोखा बुद्धिबळपट आहे. या बुद्धिबळपटाची रचना थ्रीडी तंत्रज्ञानाने करण्यात आली आहे. शिवाय याच्या सोंगट्याही अनोख्या आहेत.

✻ बर्न जगरेब ५९ मालिकेतला बुद्धिबळपट खूप सुंदर आहे. याच्या सोंगट्यांवर कोरीव काम करण्यात आलं आहे.

## सोने पे सुहागा...

गंमतगोष्टी

आरती देशपांडे

छोट्या दोस्तांनो, हिंदीमधली 'सोने पे सुहागा' हा वाक्प्रचार तुम्हाला माहिती असेल. पण याचा अर्थ ठाऊक आहे का? सोने आधीच मौल्यवान असते. पण त्यावर सुहागा लावल्यास चमक वाढते. म्हणूनच हा वाक्प्रचार चांगल्या गोष्टीत आणखी चांगले गुण जोडण्यासाठी वापरला जाते. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी परीक्षेत अव्वल झाला आणि शिष्यवृत्तीही मिळाली तर त्याला 'सोने पे सुहागा' असे म्हणता येईल.

सुहागाला इंग्रजीमध्ये बोरॅक्स म्हणतात. हे एक नैसर्गिक खनिज असून त्याचे रासायनिक नाव सोडियम बोरेट असे आहे. ते पांढऱ्या पावडर किंवा क्रिस्टलच्या स्वरूपात आढळते आणि विविध घरगुती, औद्योगिक आणि आयुर्वेदिक उपचारांमध्ये वापरले जाते.

आता बोरॅक्स कोणत्या कामात वापरले जाते, हेदेखील पाहू या.



✻ बोरॅक्सचा वापर सोने आणि चांदीचे दागिने स्वच्छ करण्यासाठी आणि चमकवण्यासाठी सर्वात जास्त केला जातो. ते धातूतील अशुद्धता काढून टाकते आणि चमक वाढवते.

✻ खोकला, घसा खवखवणे आणि सांधेदुखीवर उपचार करण्यासाठी पारंपरिक औषधांमध्ये बोरॅक्सचा वापर केला जातो.

✻ पूर्वी कपडे धुण्यासाठी आणि डाग काढण्यासाठी बोरॅक्सचा वापर केला जात असे.

## अलौकिक गणितज्ज्ञ

आपले हीरो



२२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडूतील कुंभकोणम येथील एका अत्यंत गरीब ब्राह्मण कुटुंबात रामानुजन यांचा जन्म झाला. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्यांनी त्रिकोणमितीतील (ट्रिग्नॉमेट्री) प्रगत ज्ञान आत्मसात केले होते. गणितामुळे त्यांचे इतर विषयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष डोई. यामुळे गणितात पैकीच्या पैकी गुण मिळवूनही ते इतर विषयांमध्ये नापास झाले आणि त्यांना कॉलेजचे शिक्षण अर्धवट सोडावे लागले. शिक्षण सुटल्यानंतरही रामानुजन यांनी गणिताची साधना सोडली नाही. कागद घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे ते पाटीवर खडूने गणिते सोडवायचे आणि अंतिम उत्तर एका वहीत लिहून ठेवायचे. त्यांनी मद्रास पोर्ट ट्रस्टमध्ये नोकरी सुरू केली. तिथे त्यांच्यातील अफाट प्रतिभा काही अधिकाऱ्यांच्या नजरेस पडली. त्यांच्याच सल्ल्याने रामानुजन यांनी आपली गणिताची सूत्रे इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाचे प्रसिद्ध गणितज्ज्ञ प्रोफेसर जी. एच. हार्डी यांना पत्राद्वारे पाठवली. हार्डी यांनी ती पत्रे पाहिली तेव्हा त्यांना धक्काच बसला; कारण त्यातील अनेक प्रमेये जगातील पहिल्या दर्जाच्या गणितज्ज्ञालाच सुचू शकत होती. प्रोफेसर हार्डी यांच्या आमंत्रणावरून १९१४ मध्ये रामानुजन इंग्लंडला गेले. तिथे हार्डी आणि रामानुजन या जोडीने गणितात क्रांतिकारी संशोधन केले.

## 'रहस्यमय आणि दुर्मिळ 'मलबार सिव्हेट'

बना प्राणिप्रेमी

पंकजा देव

'मलबार सिव्हेट'ला मराठीत 'मलबार कस्तुरी मांजर' असेही म्हटले जाते. हा प्राणी इतका दुर्मिळ आहे की, गेली कित्येक वर्षे तो जंगलात थेट मानवी नजरेस पडलेला नाही. मलबार सिव्हेटचे वैज्ञानिक नाव 'व्हिव्हेरा सिकाटिना' असे आहे. हा प्राणी आकाराने सामान्य मांजरापेक्षा मोठा आणि काहीसा कुत्र्यासारखा दिसतो. त्याच्या अंगावर काळे आणि पांढरे ठिपके तसेच पट्टे असतात, तर त्याची शेपटी लांब आणि झुबकेदार असते. या प्राण्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या शरीरातून निघणारा एक विशिष्ट कस्तुरीसारखा सुगंध, ज्याचा वापर पूर्वीच्या काळी अत्तर बनवण्यासाठी केला जात असे. हा प्राणी प्रामुख्याने निशाचर आहे. तो रात्री अन्नासाठी बाहेर पडतो आणि दिवसा घनदाट झाडीत किंवा जमिनीवरील ढोलीत लपून राहतो. मलबार सिव्हेट हा मांसाहारी प्राणी असून तो लहान उंदीर, बेडूक, सरडे, कीटक आणि अंडी खाऊन जगतो. कधीकधी तो जंगलातील काही विशिष्ट फळेही खातो. एकेकाळी केरळ आणि कर्नाटकातील किनारपट्टीच्या सखल भागातील घनदाट जंगलांमध्ये आणि काजूच्या बागांमध्ये या प्राण्याचा वावर मोठ्या प्रमाणावर होता. परंतु, गेल्या काही दशकांमध्ये परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर'(आययूसीएन)च्या लाल सूचीमध्ये या प्राण्याला 'अतिसंवेदनशील' म्हणजेच 'गंभीरपणे धोक्यात आलेली प्रजाती' म्हणून घोषित करण्यात आले आहे. अनेक पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, हा प्राणी कदाचित जंगलातून पूर्णपणे नामशेष झाला असण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.



मलबार सिव्हेटची संख्या इतकी कमी होण्यामागे मुख्य कारण म्हणजे मानवी हस्तक्षेप आणि त्यांच्या अधिवासाचा झालेला विनाश. पश्चिम घाटातील जंगलांची झालेली मोठ्या प्रमाणावरील तोड, शेतीसाठी आणि रस्ते बांधणीसाठी जमिनीचा झालेला वापर यामुळे या प्राण्याचे नैसर्गिक घर हिरावून घेतले गेले. याशिवाय, अत्तरासाठी आणि कातडीसाठी झालेल्या शिकारीमुळेही या प्राण्याची संख्या संपुष्टात आली. हा प्राणी रात्रीच्या वेळी रस्त्यावर आल्यावर वाहनांखाली चिरडून मरण पावल्याच्याही काही घटना भूतकाळात घडल्या आहेत.

## अनोखे विक्रम

फन टाईम

मुलांनो, या जगात इतरांपेक्षा वेगळं करणाऱ्यांची कमतरता नाही. ही माणसं काही तरी जगावेगळं करून जातात. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिनिज बुक, लिमका बुक घेतं. हे लोक विक्रमवीर बनतात. अर्थात फक्त माणसंच विक्रम करतात असं नाही तर प्राण्यांच्या नावेही विक्रमांची नोंद होते. अशाच काही विक्रम वीरांची ओळख करून घेऊ.

✻ जिफपॉम नावाचा गोंडस कुत्रा इंटरनेट सेन्सेशन आहे. इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर तो ॲक्टिव्ह असतो. या कुत्र्याचे इन्स्टाग्रामवर ९० लाख फॉलोअर्स आहेत. जिफपॉमचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.

✻ जेसिका कॉक्स ही पायलट आहे. पण तिला हात नाहीत. हात नसणारी ती जगातली एकमेव पायलट आहे. जेसिका पायांनी विमान चालवते. याच कारणामुळे तिचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.



✻ अयोध्येत दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. या वेळी पाच लाख ६१ हजार पणत्या लावण्यात आल्या होत्या.

✻ आयटीसी या कंपनीने सर्वात महागडं चॉकलेट तयार केलं. या चॉकलेटची किंमत प्रतिकिलो ४.३ लाख रुपये आहे.

## आंबा लंगडा कसा?

गप्पांगण

वीणा देशमुख

छोट्या दोस्तांनो, उन्हाळ्यात तुम्ही भरपूर आंबा खाल्ला असेल. हापूस, पायरी, रायवळ यासारख्या जातीचा आंबा तर तुम्हाला विशेष आवडत असेल. आंब्यामध्ये केसर, चौंसा, तोतापुरी, मलगोबा, 'लंगडा आंबा' अशाही अनेक जाती आहेत. चला तर, आज 'लंगडा आंबा' या नावाचा इतिहास जाणून घेऊन या.



मित्रांनो, ही कहाणी आपल्याला वाराणसीच्या सुमारे ३०० वर्षांपूर्वीच्या रस्त्यांवर घेऊन जाते. त्यावेळी तेथील एका मंदिरात एक अपंग पुजारी राहत असे. त्याला लोक प्रेमाने 'लंगडा पुजारी' म्हणत. एके दिवशी एका संताने त्याला आंब्याच्या काही बिया दिल्या आणि मंदिराजवळ पेरण्यास सांगितले. त्यावेळी त्याने प्रतिज्ञा केली की, या झाडावर फळे येतील तेव्हा प्रथम देवाला अर्पण केली जातील आणि नंतर भक्तांमध्ये वाटले जातील.

काही वर्षांमध्ये त्या झाडाला आंबे लागले तेव्हा अप्रतीम चवीने सर्वांचेच मन जिंकले. ते आंबे इतके गोड, रसाळ आणि सुगंधी होते सगळ्यांना कमालीचे आवडले. तथापि, आता समस्या होती की, अशा खास आंब्याला नाव काय द्यायचे? लोकांनी विचारले की, हा आंबा कुठून आला, तेव्हा उत्तर आले ते त्या 'लंगडा पुजारी'च्या झाडावरुन...

बस्स, मग काय... या आंब्याला त्या पुजाऱ्याचेच नाव मिळाले. 'लंगडा आंबा'. हे नाव थोडे वेगळे असले तरी त्याची चव इतर आंब्यांपेक्षा खास असते. आता ही जात वाराणसीची शान बनली असून देशभर त्याला मोठी मागणी असते.

केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही लंगडा आंबा फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन सी, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. आयुर्वेदानुसार, हा आंबा शरीराच्या अनेक समस्यांना आराम देतो. तो हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो. यातील पोषक तत्त्वे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यात असणारे फायबर पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस सारख्या समस्या दूर करते. तेव्हा पुढल्या वर्षी या जातीचा आंबा नक्की खा.

## कार्टोग्राफीचा विचार करा

कोण होणार?

सध्या विविध क्षेत्रांमध्ये कारकिर्दीच्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी एक क्षेत्र आहे कार्टोग्राफीचं. हे कार्टोग्राफर्स वेगवेगळ्या प्रकारचे नकाशे म्हणजे मॅप्स तयार करतात. आज स्मार्टफोन वापरणारा प्रत्येकजण गूगल मॅप्सचा वापर करतो. जग जवळ येत आहे. इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे डाटा जपून ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. डिजिटल व्यासपीठांवर हा डाटा जपून ठेवला जातो. या क्षेत्रातही तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. म्हणूनच हे क्षेत्र कारकिर्दीच्या असंख्य संधी उपलब्ध करून देत आहे.



या क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी तुम्ही कार्टोग्राफी, जिओग्राफी किंवा या क्षेत्राशी संबंधित कोणत्याही विषयात पदवी मिळवू शकता. कार्टोग्राफी, जिओग्राफीमध्ये डिप्लोमा, मास्टर्स, एमफील किंवा पीएचडीसारखे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पर्यावरण आणि भूगोल या विषयांची गोडी असायला हवी. यासोबतच गणितावर प्रभुत्व असणं आवश्यक आहे. लेआउट, डिझायनिंगमध्ये गती असायला हवी. कार्टोग्राफीचं शिक्षण घेतल्यानंतर तुम्ही सरकारी विभागांसह संशोधन संस्थांमध्ये काम करू शकता. जीआयएस तसंच रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजीचा वापर करणाऱ्या संस्थांनाही या तज्ज्ञांची गरज असते.

## रेल्वे ट्रॅकमध्ये दगड कशासाठी?

माहिती असावे

उर्मिला राजोपाध्ये

छोट्या मित्रांनो, तुम्ही कधी रेल्वे ट्रॅककडे बारकाईने पाहिले असेल तर दिसले असेल की, रुळांच्या मध्ये आणि खाली छोटे दगड ठेवलेले असतात. यामागचे कारण आज जाणून घेऊ या.



मुलांनो, या दगडांना 'बॅलास्ट' म्हणतात. रेल्वे ट्रॅकच्या स्थिरतेसाठी, सुरक्षिततेसाठी आणि दीर्घायुष्यासाठी ते आवश्यक असतात. तुम्ही जाणता की, ट्रेनचे वजन खूप जास्त असते. स्वाभाविकच ट्रेन वेगाने धावताना रुळांवर प्रचंड दाब असतो. मात्र हे बॅलास्ट दगड रुळांना घट्टपणे एकाजागी ठेवतात. ते एकमेकांशी जोडले जाऊन एक मजबूत आधार तयार करत असल्यामुळे रुळ हलत नाहीत. हे दगड नसतील तर रुळ हलू किंवा वाकडे होऊ शकतात. यामुळे अपघातांचा धोका वाढतो. दुसरे म्हणजे ट्रेनचे वजन थेट रुळांवर पडत असले तरी या दगडांमुळे ते पसरते आणि नंतर जमिनीवर प्रसारित होते. यामुळे रुळांवर असमान दाब पडू शकत नाही आणि ते बराच काळ टिकतात. हे दगड ठेवले नाहीत तर रुळ जमिनीत धसू शकतात किंवा तुटू शकतात. पावसाळ्यात रुळांभोवती पाणी साचते. त्यामुळे रुळ गंजण्याचा किंवा कमकुवत होण्याचा धोकाही असतो. पण या दगडांमध्ये अंतर असल्यामुळे पाणी सहजपणे बाहेर पडते आणि रुळ कोरडे राहतात. म्हणजेच ही ड्रेनेज प्रणाली रेल्वे ट्रॅकला पाणी साचण्यापासून आणि धूप होण्यापासून वाचवते.

तिसरी बाब म्हणजे ट्रेन जाताना कंपनं तयार होतात आणि आवाज निर्माण होऊ शकतो. मात्र हे दगड कंपने शोषून आवाज कमी करण्याचे कामही करतात. दगड नसतील तर ट्रेन चालताना जास्त आवाज करेल आणि आजूबाजूच्या भागात ध्वनी प्रदूषण वाढेल. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात धातूचे ट्रॅक विस्तारतात आणि आकुंचन पावतात. असे असताना बॅलास्ट स्टोन रुळांना लवचिकता देतात आणि तापमानातील बदलांमुळे होणाऱ्या विस्तार किंवा आकुंचनाचे संतुलन साधतात. यामुळे रुळांमधील भेगा पडण्यास प्रतिबंध होतो आणि ते दीर्घकाळ सुरक्षित राहतात.

## प्रेरणादायी पुस्तक

वाचनविश्व

महान शास्त्रज्ञांच्या जीवनप्रवासाची आणि त्यांच्या ऐतिहासिक शोधांची रंजक सफर घडवून आणणारे एक अप्रतिम पुस्तक म्हणजे 'शास्त्रज्ञांच्या चरित्रकथा'. या पुस्तकात जगाला अंधारातून प्रकाशाकडे नेणारे थॉमस अल्वा एडिसन, गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारे सर आयझॅक न्यूटन, सापेक्षतेचा सिद्धांत मांडणारे अल्बर्ट आइनस्टाइन, आणि रेडियमचा शोध लावणाऱ्या मेरी क्युरी यांच्यासारख्या जगप्रसिद्ध पाश्चात्त्य शास्त्रज्ञांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला आहे.



यासोबतच, भारताचे नाव जगभरात उज्ज्वल करणाऱ्या महान भारतीय शास्त्रज्ञांचाही यात प्रामुख्याने समावेश आहे. नोबेल पुरस्कार विजेते सर सी. व्ही. रमन, भारताच्या अंतराळ मोहिमेचे जनक विक्रम साराभाई, होमी भाभा आणि भारताचे 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या चरित्रकथा वाचकाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात आणि अभिमानाने छाती फुगून येते.

पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याची अत्यंत साधी, सोपी आणि ओघवती भाषा. विज्ञान आणि त्यातील संज्ञा बऱ्याचदा सामान्यांसाठी क्लिष्ट वाटतात. परंतु, लेखकाने या पुस्तकात कोणत्याही क्लिष्ट वैज्ञानिक समीकरणांमध्ये न पडता, शास्त्रज्ञांच्या मानवी बाजूला अधिक अधोरेखित केले आहे. एडिसनने विजेचा दिवा लावण्यापूर्वी केलेले हजारो अयशस्वी प्रयोग आणि त्यानंतर मिळालेले यश, ही कथा वाचताना अंगावर काटा येतो आणि अपयशाने खचून न जाण्याचा मोठा संदेश मिळतो.

हे पुस्तक केवळ भूतकाळातील शोधांची माहिती देत नाही, तर ते आजच्या तरुण पिढीला आणि विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन देते. घोकंपट्टी करून परीक्षा देण्यापेक्षा, अवतीभवती घडणाऱ्या घटनांकडे कशा कुतूहलाने आणि चिकित्सक बुद्धीने पाहिले पाहिजे, हे हे पुस्तक शिकवते. प्रत्येक कथेच्या शेवटी त्या शास्त्रज्ञाने दिलेल्या संदेशाचा किंवा त्यांच्या जीवनातून मिळणाऱ्या बोधाचा समावेश केल्यामुळे हे पुस्तक अधिक मार्गदर्शक बनले आहे.

हे पुस्तक केवळ ज्ञानवर्धन करत नाही, तर विचार करायला प्रवृत्त करते आणि मनात स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची जिद्द निर्माण करते.

### दोस्त हे मस्त

#### अशी असतात छोटुली पिल्लं



छोट्यांनो, प्राण्यांची पिल्लं खूप गोंडस असतात. नुकत्याच जन्मलेल्या हत्तीच्या पिल्लाचं वजन जवळपास ११२ किलो तर लांबी ८३ सेंटीमीटरच्या आसपास असते. एकशिंगी गेंड्यांच्या पिल्लाच्या नाकावर लहानपणी शिंग नसतं. पिल्लू मोठं झाल्यावर हे शिंग विकसित होतं. सीलच्या पिल्लाला 'पप्स' असं म्हणतात. गंमत म्हणजे ही पिल्लं जन्मल्यावर लगेच पोहू शकतात. पांडाच्या पिल्लांचं वजन खूपच कमी म्हणजे जवळपास १०० ग्रॅमच्या आसपास असतं. कुत्र्याच्या पिल्लांना जन्मल्यानंतर जवळपास दोन आठवडे दिसत नाही तसंच ऐकूही येत नाही.

### खादाडी

#### गरमागरम चीझी राउंड



दोस्तांनो, चीझ राउंड हा पदार्थ एकदा बनवून बघा. यासाठी चार बटाटे उकडून घ्या. पाव कप बटर, किसलेलं अर्धा कप चीज, पाव कप कांद्याची पात, चमचाभर चिली फ्लेक्स, बटाट्यांचे गोलाकार काप एकत्र करून घ्या. यानंतर मायक्रोवेव्ह २०० अंशात प्री हिट करून घ्या. बटाट्याच्या चकत्यांच्या दोन्ही बाजूंना बटर लावून घ्या. आता बेकिंग ट्रे घ्या. त्यावर कुकीज शीट ठेवा. त्यावर बटाट्याचे काप ठेवा. यानंतर बटाट्यावर किसलेलं चीज घाला. थोडा वेळ मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीज वितळल्यावर बेकिंग ट्रे बाहेर काढा. त्यावर कांद्याची पात घाला. वरून चिली फ्लेक्स भुरभुरा. हे चीज राउंड सॉससोबत खा.

### स्टडी टिप्स

#### अभ्यासाची शास्त्रीय पद्धत

छोट्यांनो, अभ्यासाच्या वैज्ञानिक पद्धती आहेत. या पद्धतींनी अभ्यास केल्यास बरेच लाभ होऊ शकतात. एकाच विषयाचा अभ्यास वेगवेगळ्या ठिकाणी केल्यामुळे अधिक चांगल्या प्रकारे लक्षात राहू शकतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्यामुळे आपला मेंदू एकच माहिती वेगवेगळ्या पद्धतींनी साठवून ठेवतो. यामुळे स्मरणशक्ती सुधारते. हा प्रयोग करून बघायला हरकत नाही.



### योगा टाईम

#### करा हे आसन

मुलांनो, पावसाळ्याच्या दिवसात तुम्ही वेगवेगळी आसनं करू शकता. यापैकीच एक म्हणजे सुप्त मत्स्येंद्रासन. हे आसन पलंगावर झोपूनही करता येतं. ते केल्याने पाठीचा कणा बळकट होतो. शिवाय स्नायूंची क्षमता वाढते. तेव्हा हे आसन करा आणि तंदुरुस्त रहा.



## आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा

# १२ शहरांमध्ये क्रिकेटचा थरार

■ दक्षिण आफ्रिकेत ८ ठिकाणे, झिम्बाब्वे-नामिबिया देखील यजमान; २४ वर्षांनंतर आफ्रिकेत विश्वचषक

। जोहान्सबर्ग । वृत्तसंस्था ।

दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या आयसीसी पुरुष क्रिकेट एकदिवसीय विश्वचषकासाठी क्रिकेट चाहत्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. आयसीसीने या भव्य स्पर्धेसाठी १२ ऐतिहासिक आणि नवीन ठिकाणांची नावे निश्चित केली आहेत. या तीन देशांमध्ये संयुक्तपणे खेळली जाणारी ही प्रतिष्ठित स्पर्धा केवळ खेळाचा थरारच दाखवणार नाही, तर यात एक नवीन स्पर्धा स्वरूपही पाहायला मिळेल.

या वर्षी, एकदिवसीय विश्वचषकाचा(२०२७एकदिवसीय विश्वचषक) सर्वात मोठा भाग दक्षिण आफ्रिकेत आयोजित केला जाईल. हा आफ्रिकन देश आठ शहरांमधील स्टेडियममध्ये सामन्यांचे आयोजन करण्यास सज्ज आहे. जोहान्सबर्गचे ऐतिहासिक वँडरर्स स्टेडियम, त्शवानेचे सेंचुरियन स्टेडियम, केप टाऊनचे नयनरम्य न्यूलँड्स क्रिकेट ग्राउंड आणि डर्बनचे किंग्समीड स्टेडियम पुन्हा एकदा विश्वचषकातील अविस्मरणीय क्षणांचे साक्षीदार होतील. याव्यतिरिक्त, जगातील आघाडीचे संघ गकेबारहा येथील सेंट जॉर्ज पार्क, ब्लोमफॉन्टेन येथील मांगाउंग ओव्हल, पार्ल येथील बोलँड पार्क आणि कुगोम्पो शहरातील बफेलो पार्क येथे भिडतील.

हा दक्षिण आफ्रिकेचा पहिला अनुभव नाही. २००३ मध्ये त्यांनी पहिल्यांदा एकदिवसीय विश्वचषकाचे सह-आयोजन केले होते. त्यानंतर, या देशाने २००७ मध्ये पहिला टी-२० विश्वचषक, २०२३ मध्ये महिला टी-२० विश्वचषक आणि २०२० व २०२४ मध्ये १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषक यांसारख्या प्रमुख आयसीसी स्पर्धांचे यशस्वीपणे आयोजन केले आहे.

लीग टप्पा पूर्ण झाल्यावर, प्रत्येक गटातील अव्वल तीन संघ आणि दोन्ही गटांतील त्यानंतरची सर्वोत्तम कामगिरी करणारा संघ, म्हणजेच एकूण सात संघ, पुढील फेरीत प्रवेश करतील. याला ङ्गसुपर ७फ टप्पा म्हटले जाईल. सुपर ७ मध्ये, सर्व सात संघ एकूण २१ राऊंड-रॉबिन सामने खेळतील, ज्यात प्रत्येक गुणासाठी तीव्र चुरस असेल. सुपर ७ चा थरार संपल्यानंतर, गुणतालिकेतील अव्वल चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेला संघ पहिल्या उपांत्य फेरीत चौथ्या स्थानावरील संघाशी सामना करेल, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावरील संघ दुसऱ्या उपांत्य फेरीत एकमेकांविरुद्ध खेळतील.



### मुख्य टप्प्याची सुरुवात सुपर सिरीजने

या स्पर्धेची सुरुवात सुपर सिरीजने होईल, जी क्रमवारीत १२व्या ते १४व्या क्रमांकावर असलेल्या तीन संघांमधील लढत असेल. ही सिरीज जिंकणारा संघच मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरेल. त्यानंतर १२ मुख्य संघांना प्रत्येकी सहा संघांच्या दोन गटांमध्ये विभागले जाईल. लीग टप्प्यामध्ये, प्रत्येक संघ आपल्या गटातील इतर संघांविरुद्ध एक सामना खेळेल. केवळ या सुरुवातीच्या टप्प्यातच एकूण ३० सामने खेळले जातील.

### नामिबिया इतिहास घडवणार

या स्पर्धेचे वात अद्वितीय आणि ऐतिहासिक वैशिष्ट्य म्हणजे नामिबियाचा सहभाग. नामिबिया पहिल्यांदाच वरिष्ठ आयसीसी स्पर्धेचे आयोजन करत आहे. राजधानी विंडहोकमधील नामिबिया क्रिकेट ग्राउंडची या भव्य कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली आहे, जो नामिबियाच्या क्रिकेट इतिहासाच्या सुवर्ण पानांमध्ये नोंदवला जाईल. नामिबिया आणि झिम्बाब्वेने यावर्षी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषकाचे यशस्वीपणे आयोजन केले होते.

## इंग्लंड कसोटी संघात उलथापालथ

### कर्णधार आणि हेड कोच दोन्ही बदलले

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इंग्लंड कसोटी संघात मोठे उलटफेर झाल्याचं पाहायला मिळत आहे. बेन स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकल्यानंतर बदल अपेक्षित होता. पण इंग्लंड संघाने नव्या कर्णधारासह हेड कोचची घोषणाही केली आहे.

जो रूटच्या खांद्यावर पुन्हा एकदा कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. यापूर्वी जो रूटने संघाची धुरा सांभाळली आहे. त्याच्या नेतृत्वात इंग्लंडने २७ कसोटी सामने जिंकले आहेत. त्यामुळे इंग्लंडला अनुभवी कर्णधार मिळाला आहे. दुसरीकडे, इंग्लंड क्रिकेट बोर्डाने स्टीफन फ्लेमिंगची हेड कोच म्हणून नियुक्ती केली आहे. त्याने ब्रँडन मॅक्कलमची जागा घेतली आहे.

फ्लेमिंगने न्यूझीलंडसाठी १११ कसोटी सामने खेळले आहेत. तसेच चेन्नई सुपर किंग्ससाठी १८ वर्षे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. त्यामुळे त्याच्याकडे तगडा अनुभव असून इंग्लंडच्या कामी येणार आहे.

स्टीफन फ्लेमिंगने हेड कोच पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मन मोकळं केलं. मुख्य प्रशिक्षक म्हणून जो रूटसोबत काम करण्यास उत्सुक असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. स्टीफन फ्लेमिंग म्हणाले की, इंग्लंड संघात सामील झाल्याचा मला खूप आनंद आहे. जागतिक क्रिकेटमधील हे सर्वात प्रतिष्ठित प्रशिक्षक पदांपैकी एक आहे आणि ही भूमिका स्वीकारल्याचा मला अभिमान आहे.

मी खेळाडूंसोबत काम करण्यास आणि मॅककुलम व स्टोक्स यांनी केलेल्या कामगिरीवर आधारित पुढील वाटचाल करण्यास उत्सुक आहे. आमचे ध्येय जिंकणे आहे, त्याचबरोबर संघाचे भविष्य घडवणे हे सुनिश्चित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. जो रूटकडे चार वर्षानंतर कर्णधारपदाची जबाबदारी पुन्हा आली आहे. इंग्लंडचं ६५ कसोटी सामन्यात नेतृत्व केलं होतं. त्यात २७ सामन्यात विजय मिळवला आहे.

## निवडक

### नागपुरात महिला क्रिकेटरची आत्महत्या

**नागपुर** : महाराष्ट्रातील नागपूरमध्ये एका १७ वर्षीय महिला क्रिकेटपटूने आत्महत्या केली आहे. क्रिकेटपटूचे नाव अदिती चौखंडे आहे. घटनास्थळावरून एक सुसाईड नोटही सापडली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले, त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अदिती चौखंडे मूळची महाराष्ट्रातील अकोला येथील होती. गेल्या दोन वर्षांपासून ती नागपूरच्या लक्ष्मी नगरमधील उमलक्ष्मी अपार्टमेंटमध्ये तिच्या आईसोबत राहत होती. ती सुर्वे क्रिकेट अकादमीमध्ये नियमितपणे सराव करत होती आणि उच्च स्तरावर क्रिकेट खेळण्याचे तिचे स्वप्न होते. विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या निवड प्रक्रियेतून वगळल्यामुळे ती अलीकडेच मानसिक तणावाखाली होती. ही घटना नागपूरच्या बजाज नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अदितीने बुधवारी रात्री तिच्या आईसोबत जेवण केले आणि त्यानंतर ती तिच्या खोलीत गेली. गुरुवारी सकाळी तिचा मृतदेह खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची माहिती मिळताच, बजाज नगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. घटनास्थळावरून एक सुसाईड नोटही सापडली, ज्यात लिहिले होते, ''माझी निवड झाली नाही.''कुटुंबाचे क्रिकेटशी असलेले घट्ट नाते पोलिसांनी सांगितले की, आदितीचे वडील अकोल्यामध्ये सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर आहेत. ती नागपूरमध्ये तिच्या आई आणि मोठा भाऊ, प्रबल चौखंडे यांच्यासोबत राहत होती. घटनेच्या वेळी तिचा भाऊ शहराबाहेर होता. प्रबल चौखंडे हा देखील क्रिकेटमध्ये असून तो एक उदयोन्मुख खेळाडू असल्याचे म्हटले जाते.

### स्क्वॉश ज्युनियर संघ उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली** : कॅनडाच्या ओंटारियो येथे सुरू असलेल्या वर्ल्ड ज्युनियर स्क्वॉश टीम चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी संमिश्र दिवस राहिला. भारतीय पुरुष संघाने उपांत्यपूर्व फेरीत तिसऱ्या मानांकित इंग्लंडला २-१ ने हरवून उपांत्य फेरीत स्थान मिळवले. आता त्यांचा सामना यूएसएशी होईल. तर, भारतीय महिला संघ उपांत्यपूर्व फेरीत यूएसए कडून १-२ ने हरून स्पर्धेतून बाहेर पडला.गेल्या वर्षी भारताने या स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते आणि यावेळी संघ आपला खेळ सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. सामन्याच्या सुरुवातीला आर्यवीर दिवाणने रॉनी हिकलिंगला ११-९, १२-१०, ११-५ ने हरवून भारताला १-० ची आघाडी मिळवून दिली. यानंतर इंग्लंडच्या इस्माईल खलीलने युशा नफीसला ११-७, ८-११, ११-४, १३-११, ११-७ ने हरवून गुण १-१ ने बरोबरीत आणले. शेवटी गुरवीर सिंगने जॉर्ज ग्रिफिथ्सला ११-३, ११-८, ११-६ ने सरळ गेममध्ये हरवून भारताला विजय मिळवून दिला. महिला संघाच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारताला अमेरिकेकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला.



## भारतीय हॉकी संघाच्या नवीन जर्सीवर वाद

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय हॉकी संघाच्या नवीन जर्सीवरून वाद वाढत असल्याचे दिसत आहे. एका अहवालात एका खेळाडू आणि हॉकी इंडियाच्या एका अधिकाऱ्याच्या हवाल्याने दावा करण्यात आला आहे की, जर्सीच्या रंगातील बदलाबाबत खेळाडूंना विचारण्यात आले नव्हते.पुढील महिन्यात होणाऱ्या हॉकी विश्वचषकासाठी हॉकी इंडियाने २७ जुलै रोजी निळ्या जर्सीऐवजी नारंगी जर्सी लॉंच केली आहे. या बदलानंतर अनेक माजी हॉकी खेळाडू आणि दिग्गजांनी नाराजी व्यक्त केली आहे.



भारतीय हॉकीचे दिग्गज खेळाडू आणि माजी कर्णधार विरेन रासकिन्हा यांनी या निर्णयाला उघडपणे विरोध केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर आपली नाराजी व्यक्त करत म्हटले की, भारतीय संघाची ओळख नेहमीच निळी जर्सी राहिली आहे आणि ती बदलण्याचे कोणतेही कारण समजत नाही. रासकिन्हा यांनी एक्सवर लिहिले की, हॉकी इंडियाने भारतासाठी अनेक चांगली कामे केली आहेत, पण हा निर्णय लाजिरवाणा आहे. ते म्हणाले की, मी अनेक वर्षे अभिमानाने निळी जर्सी परिधान केली आहे आणि चाहतेही संघाला याच रंगात पाहू इच्छितात. त्यांनी प्रश्न विचारला की, नारंगी किंवा भगव्या रंगाचे कारण काय आहे.

## दिलीप गावितने जिंकले गोल्ड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल खेळांच्या ७ व्या दिवशी भारताने ऐतिहासिक कामिगिरी केली. भारताने पॅरा ॲथलेटिक्समधील पुरुषांच्या १०० मीटर ४७ अंतिम शर्यतीत सुवर्ण आणि रौप्य दोन्ही पदके जिंकण्यात यश मिळवले.




दिलीप गावितने पुरुषांच्या १०० मीटर ४७ प्रकारात १०.७१ सेकंदांचा विक्रम प्रस्थापित करून सुवर्णपदक जिंकले. तर मोहम्मद बासिल मोरसिंघनकथने १०.८३ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले. यासह भारताच्या खात्यात एकूण तीन सुवर्णपदकांची भर पडली असून, पदकांची एकूण संख्या १५ झाली आहे. पुरुषांची १०० मीटर ४७ ही स्पर्धा शारीरिक अपंगत्व असलेल्या किंवा एक हात नसलेल्या खेळाडूंसाठीची एक पॅरा-ॲथलेटिक्स स्प्रिंट स्पर्धा आहे. पॅरा-ॲथलीट दिलीप गावितने २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या १०० मीटर ४७ प्रकारात सुवर्णपदक जिंकून एक मोठा टप्पा गाठला. या स्पर्धेत पॅरा-ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे.

## प्रवीण, सेल्व्हा अंतिम फेरीत दाखल

**ग्लासगो :** भारताचा राष्ट्रीय विक्रमवीर प्रवीण चित्रवेल आणि सेल्व्हा प्रभू यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या तिहेरी उडी (ट्रिपल जंप) प्रकारात चमकदार कामगिरी करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. गुरुवारी झालेल्या पात्रता फेरीत चित्रवेलने दुसरे, तर सेल्व्हा प्रभूने तिसरे स्थान पटकावून शनिवारी होणाऱ्या पदक फेरीतील आपले स्थान निश्चित केले. ग्लासगोमधील थंड आणि अत्यंत वारेशीर हवामानात पार पडलेल्या पात्रता फेरीत सहभागी १४ खेळाडूंपैकी एकालाही १६.६० मीटरची थेट पात्रता मर्यादा पार करता आली नाही. चित्रवेलने आपल्या पहिल्याच प्रयत्नात १६.४१ मीटरची उडी मारत दुसरे स्थान पटकावले. पहिल्याच प्रयत्नात अंतिम फेरीतील स्थान जवळपास निश्चित झाल्याने त्याने दुसरा आणि तिसरा प्रयत्न केला नाही. १७.३७ मीटरचा राष्ट्रीय विक्रम नावावर असलेल्या चित्रवेलची या मोसमातील सर्वोत्तम कामगिरी १७.०८ मीटर राहिली. दुसरीकडे, सेल्व्हा प्रभूला सुरुवातीला मोठ्या दडपणाचा सामना करावा लागला.

## पुणेरी स्ट्रायकर्सची विजयी सलामी

### डीएसपी करंडक मान्सून लीग

। पुणे। वृत्तसंस्था ।

डीएसपी स्पोर्ट्स अँड इव्हेंटस यांच्या सौजन्याने आयोजित डीएसपी करंडक मान्सून लीग मिश्र कॉर्पोरेट क्रिकेट स्पर्धेत पुणेरी स्ट्रायकर्स क्लब आणि कॉर्पोरेट क्रशर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांवर मात करत स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे.वाघोली येथील पुणे क्रिकेट क्लबच्या मैदानावर पार पडलेल्या साखळी फेरीतील पहिल्या सामन्यात पुणेरी स्ट्रायकर्स क्लबने प्लॅटिनम क्रिकेट क्लबचा ४६ धावांनी पराभव केला.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पुणेरी स्ट्रायकर्स संघाने २० षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात १७४ धावांची भक्कम धावसंख्या उभारली. यात ऋतुराज तावरे याने ५४ चेंडूंत ८ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ७८ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी केली. त्याला शुभम हुलगे आणि निखिल जी यांनी चांगली साथ दिली. प्लॅटिनम क्लबकडून विकास नेहे याने २६ धावांत ३ गडी बाद केले.

विजयासाठी १७५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना प्लॅटिनम क्रिकेट क्लबचा डाव १६.२ षटकांत सर्वबाद १२८ धावांवरच आटोपला. प्लॅटिनम संघाकडून अभिजीत काळे आणि प्रज्वल साळुंखे यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पुणेरी स्ट्रायकर्सच्या गोलंदाजांसमोर त्यांचा निभाव लागला नाही. आदेश उपाध्यायने १३ धावांत ३ गडी बाद केले, तर महेश चव्हाण आणि निखिल जी यांनी प्रत्येकी २-२ गडी बाद करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ७८ धावांची नाबाद खेळी करणाऱ्या ऋतुराज तावरेला सामनावीर घोषित करण्यात आले.

दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात कॉर्पोरेट क्रशर्स संघाने इलाइट ११ संघावर १५ धावांनी संघर्षपूर्ण विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना कॉर्पोरेट क्रशर्सने २० षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात १६८ धावा केल्या. आदर्श चड्ढा याने ५१ चेंडूंत ९ चौकारांसह नाबाद ६५ धावांची संयमी व आक्रमक खेळी केली.

वैभव सक्सेनाने ३२ तर निशित कुमारने नाबाद २१ धावांचे योगदान दिले.प्रतिउत्तरा दाखल इलाइट ११ संघाचा संपूर्ण डाव १९ षटकांत १५३ धावांवर गारद झाला. हेमंत चौधरीने २६ चेंडूंत ४१ धावांची तर मनीष अहलावतने २० धावांची खेळी केली. कॉर्पोरेट क्रशर्सच्या गोलंदाजांनी सुरेख मारा करत इलाइट ११ ला रोखले.

## १५ ऑगस्टपासून भारत-श्रीलंका टेस्ट सिरिज



■ शुभमन गिल करणार भारतीय संघाचे नेतृत्व

■ जसप्रीत बुमराहचे संघात झाले पुनरागमन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. १५ ऑगस्टपासून भारतीय संघ श्रीलंका संघाविरुद्ध दोन सामन्यांची टेस्ट सिरिज खेळणार आहे. ही टेस्ट सिरिज वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत खेळवली जाणार आहे. शुभमन गिल भारताचे नेतृत्व करणार आहे.

भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यातील टेस्ट सिरिज केवळ द्विपक्षीय लढत नसून, आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपसाठी पॉईंट्स टेबलच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असणार आहे. ७ ऑगस्टपासून कोलंबोमध्ये चार दिवस सराव सामना खेळवला जाणार आहे. तर पहिला सामना १५ ते १९ तर दुसरा सामना २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान होणार आहे.

शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. तर केएल राहुल भारताचे उपकर्णधारपद भूषवणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉईंट्स टेबलमध्ये ९ सामन्यानंतर ४८.१५ पीसीटीसह पाचव्या स्थानावर आहे. भारतीय संघाने श्रीलंकेविरुद्ध चांगले प्रदर्शन केल्यास भारताची स्थिती अधिक मजबूत होऊ शकते.

### रोहित-यशवीरचीही दमदार कामगिरी | रुमेश थरंगा ठरला अव्वल

## नीरज चोप्रा फायनलमध्ये

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भालाफेक स्पर्धेत भारताचा स्टार खेळाडू नीरज चोप्राने पात्रता फेरीत पाचवे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. फक्त नीरजच नाही तर, तर भारताचे तिन्ही भालाफेकपटूने पात्रता फेरीतील आव्हान यशस्वीपणे पार केले. रोहित यादव आणि यशवीर सिंग यांनीही दमदार कामगिरी करत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे.




ग्लासगो येथे झालेल्या पात्रता फेरीत, नीरज चोप्राने भालाफेकीत ७९.६१ मीटरचा सर्वोत्तम प्रयत्न केला. नीरजने पहिल्या प्रयत्नात ७६.२८ मीटरचे अंतर गाठले. परंतु, यापेक्षाही प्रभावी कामगिरी अपेक्षित होती. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ७९.६१ मीटरचा थ्रो करून थेट पाचवे स्थान पटकावले. या सर्वोत्तम प्रयत्नाच्या जोरावर त्याने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. त्यानंतर त्याने तिसरा प्रयत्न केला नाही. या स्पर्धेत हवामानामुळे खेळाडूंसमोर मोठे आव्हान उभे राहिले. ग्लासगोमधील थंड आणि ढगाळ हवामानामुळे, कोणताही खेळाडू ८४ मीटरचा ऑटोमेटिक पात्रतेचा गुण गाठू शकला नाही. त्यामुळे, दोन्ही गटांच्या सर्वोत्तम कामगिरीच्या आधारावर अंतिम फेरीतील स्पर्धकांची निवड करण्यात आली. भारताच्या रोहित यादवने पहिला प्रयत्न ७७.०४ मीटर आणि दुसरा प्रयत्न ७८.३७ मीटरचा केला. त्याने तिसरा प्रयत्न केला नाही आणि तो नवव्या स्थानावर राहिला. यशवीरचा पहिला प्रयत्न ७३.८९ मीटर होता, त्यानंतर त्याचा दुसरा प्रयत्न ७४.४५ मीटर होता. तो पात्र ठरणार नाही असे वाटत होते. मात्र, आपल्या तिसऱ्या प्रयत्नात यशवीरने ७८.३६ मीटर फेक करून अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली. यामुळे भारताला पदकाचे तीन प्रबळ दावेदार मिळाले आहेत.

## दक्षिण कोरियात पुण्याचा डंका!

### जागतिक तायक्कांदो स्पर्धेत भारताची ३ सुवर्णासह २० पदकांची कमाई

। पुणे । प्रतिनिधी ।

दक्षिण कोरियातील मुजू येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड तायक्कांदो कल्चर एक्सपो चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसीई) तसेच इंचॉन येथे आयोजित वर्ल्ड ऑलिम्पिक तायक्कांदो फेडरेशन यांच्या स्पर्धांमध्ये पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्कांदो दो-जांग असोसिएशन आणि सेंट फेलिक्स स्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत भारताचा गौरव वाढविला. दोन्ही स्पर्धांमध्ये खेळाडूंनी मिळून ३ सुवर्ण, ९ रौप्य आणि ८ कांस्य अशी एकूण २० पदके जिंकत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

मुजू येथे झालेल्या वर्ल्ड तायक्कांदो कल्चर एक्सपो चॅम्पियनशिपमध्ये पूमसे आणि क्योरोगी प्रकारात खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. मंथन देवी आणि कृती दवे यांनी प्रत्येकी १ सुवर्ण व १ रौप्य पदकाची कमाई केली. आरवी गवारे हिने २ कांस्य पदके जिंकली, तर कल्याणी डफळ हिने १ सुवर्ण व १ कांस्य पदक पटकाविले. प्रांजल पानसे हिने १ रौप्य व १ कांस्य पदक मिळवत संघाच्या यशात मोलाची भर घातली. या स्पर्धेत संघाने एकूण ३ सुवर्ण, ३ रौप्य आणि ३ कांस्य पदके जिंकली.

यानंतर इंचॉन येथे झालेल्या वर्ल्ड ऑलिम्पिक तायक्कांदो फेडरेशनच्या स्पर्धेतही खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी कायम राखली. पूमसे आणि क्योरोगी प्रकारात मंथन देवी याने २ रौप्य पदके जिंकली. कृती दवे, आरवी गवारे, कल्याणी डफळ आणि प्रांजल पानसे यांनी प्रत्येकी १ रौप्य व १ कांस्य पदक मिळवत संघाच्या पदकसंख्येत भर घातली. या स्पर्धेत संघाने ६ रौप्य आणि ५ कांस्य पदके पटकाविली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)